# सर्वदर्शनसंग्रहः

## चार्वाकदर्शनम्

मूल्यं अष्टाणकाः

मराठी ग्रंथालय
अध्यात्म ४५८
८८८४
मांक

# सर्वदर्शनसंग्रहः

## चार्वाकदर्शनम्

अयं ग्रंथः

गीर्वाणगिरा सायणमाधवाचार्येण विरचितः तस्य महाराष्ट्र

भाषांतरं विधाय धीमतां मननवतांच

लोकानामुपयोगार्थं

**रामचंद्रसूनुर्व्यंकटेशशर्मणा**

पुण्यग्रामे

बुधवार वीथ्यायां ज्ञानचक्षुमुद्रणालये अंकयित्वा प्रसिद्धिंनीतः

शाकाब्दाः १८१९

[ सर्वप्रकारकं स्वामित्वं स्वहस्ते रक्षितं ]

# सर्वदर्शनसंग्रह.

## चार्वाकदर्शन.

हा ग्रंथ

संस्कृत भाषेंत सायण माधवाचार्य्य ह्यांनीं केला आहे.

त्याचें मराठी भाषांतर करून बुद्धिमान् व विचारवंत लोकांकरितां,

**व्यंकटराव रामचंद्र**

ह्यांनीं

पुणें, बुधवार पेंठ येथें,

'ज्ञानचक्षु' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला आहे.

शके १८१९.

[ सर्व प्रकारचे हक्क राखून ठेविले आहेत. ]

दा. नं. ६६

# शुद्धिपत्र.

## संस्कृत प्रस्तावना.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ५ | खंडणं | खंडनं |
| ,, | २४ | दृष्टुं | द्रष्टुं |

## संस्कृत उपोद्घात.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ८ | पदार्थान् | पदार्थाना |
| ,, | १५ | तत्रेवं | तत्रैवं |
| ,, | १९ | स्वप्नोपप्तत् | स्वप्नोऽभवत् |
| ,, | २१ | विद्वभिः | विद्वद्भिः |
| ,, | २३ | नास्त्रियं | नास्मरं |
| २ | ५ | अतीवागांधा | अतीवागाधां |
| ,, | ९ | कुत्रत्या | कुत्रत्याः |
| ,, | १० | ण्यददां | ण्यददं |
| ,, | १३ | वर्त्तरन् | वृत्ताः |
| ,, | २० | तेभ्यो | तेभ्यः |
| ,, | २३ | कटि | कठि |
| ,, | २७ | सजाजीयाः | सजातीयाः |
| ३ | ८ | घटायितव्यामिति | घटायितव्यानीति |
| ,, | ,, | सपादायितुं | संपादायितुं |
| ,, | ९ | केणां | केणाऽ |
| ,, | १३ | पेक्षास्ति | पेक्षाऽस्ति |
| ,, | २० | व्यक्तिवषयंकं | व्यक्तिविषयकं |
| ,, | २१ | यविषयक अन्न | योऽन्न |
| ४ | २० | सत्यापयतुं | सत्यापयितुं |
| ५ | २ | तत्पुस्तकस्य | तत्पुस्तकस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, | ४ | वेदोनादिर्त | वेदोनादिस्त |
| ,, | ६ | ख्रिस्तादि | ख्रिस्तादयः |
| ,, | १२ | प्रदाप्य | प्रदाय |
| ६ | ७ | तर्हिते | ते |
| ,, | १३ | नालंकुपा | नालंकुर्याद |
| ,, | ,, | दथवा | दथवाकोपि |
| ,, | १५ | तस्मै | तस्मै केनापि |
| ७ | १३ | संबंधःपतति | संबंधोभवति |
| ,, | १४ | स्वीकरो | स्वीकारो |
| ,, | १७ | तादृग्मम | तादृङ्मम |
| ,, | २२ | यो ज्ञानसमुदायःज्ञे | ज्ञेयसमुदा |
| ८ | ६ | विमर्शनं | सर्वशक्तिमत्वविमर्शनं |
| ,, | २५ | त | ते |
| १० | १४ | तुंत्तं | त्वेत्तु |
| ११ | २२ | मूषकस्यः | मूषकस्य |
| १२ | २६ | मन्यंते | मतं |
| १३ | १० | सौदामिनी | सा |
| ,, | ११ | शाखि | शाखि |
| १५ | १० | पाद्य | पादाद्य |
| ,, | २६ | तावदुःखं | तावद्दुःखं |

## प्राकृत उपोद्घात.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | २ | सिद्धेसि | सिद्धीस |
| १४ | २१ | नेक | अनेक |
| १५ | २३ | च्यार्य | चार्य |
| ११ | ११ | च्यार्य | चार्य |
| ,, | ,, | च्यार्य | चार्य |
| ,, | ,, | च्यार्य | चार्य |

## चार्वाकदर्शनं

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १५ | त्यत्कु | त्यक्तु |
| ५ | २२ | नरकं | नरकः |
| ७ | ४ | मव्यक्तिः | मित्युक्तिः |
| ९ | ११ | ह्यांचा | ह्यांच्या |
| ११ | ४ | तो तो | तो |
| १२ | १६ | चेतृप्ति | चेत्तृप्ति |
| ,, | २० | पिबेत | पिबेत् |
| १४ | २१ | अश्रावण | अश्रावणता |
| ,, | ,, | गाहीं | नाहीं |

# प्रस्तावना

विदुषां पुरुषाणामयं ग्रंथः द्वैविध्येनोपयोक्ष्यते। नास्तिकमतं सत्यमेवेति यदि निश्चिनुयुस्तर्हि तत् स्वीकृत्य तदितराणि सर्वाणि मतानि निर्भयं त्याज्यानि। अपरञ्च नास्तिकमतं तथ्यं यदि न भवेत् तदा तस्य यथाशास्त्रं खंडणं कृत्वा आस्तिकमतदार्ढ्यं संपादयेयुः। आस्तिकनास्तिकमतंविना अन्यत्तृतीयं मतं परमेश्वरविषयकं न संभवति। अतः परमार्थतयाऽऽस्तिकमतं ज्ञातुं द्रढयितुंच एषामाशयोभवेत् तैर्नास्तिकमतस्य विचारोऽवश्यंक्रियतां। कश्चिदास्तिकः नास्तिकमतं खंडयितुं यदि नशक्नुयात्। आस्तिकमतमेव सत्यमित्याग्रहंच कुर्याच्चेत् स विचारशून्यो देवानांप्रियश्चेति ज्ञातव्यं। किंच सयद्ब्रूयात् तद्विचारानर्हमिति वेद्यं। परंत्वेतादृशः पुरुषः जगति बाहुल्येनास्थितानज्ञजनान् स्वयं तर्कबाहुल्येनाज्ञातं मतं नोपदिशेत्। यतः जगत्सु बहवोजनाः अजापुत्रवत् संति। यत्तदीयः कश्चिदग्रसरः पुरोभूय गिरिशिखरादधः उत्पत्तंश्चेत् तमनुसृत्य शेषाः अजापुत्राः तथैव उड्डीयम्रियंतेच। सर्वधर्मानुयायिनां नृणांसुशिक्षिताः बहवः एवं दृश्यंते। यथा कश्चित् भीरुः वृश्चिकं सर्पं वा दृष्ट्वा बिभेति तथा ते नास्तिकमतावलोकनाद्भीत्वा तन्मतग्रंथस्य स्वहस्तेन स्पर्शमपिनकुर्वंति। परंतु ते यावदेवं कुर्युः तावदज्ञानेनिमज्जेयुः।

किंचेदमत्रावश्यमेव सूचनीयं। यल्लोके जनाः एवंविधाः संति। स्वधर्मप्रातिबंधं त्यक्त्वा स्वेच्छानुरूपेण यथासुखं वर्तंते। तेषां जनानां एतद्ग्रंथावलोकनेन मनस्येवं भवेत्। यत्स्ववर्तनस्य प्रमाणभूतः साहाय्यकारीचायं ग्रंथोऽस्तीति। एवं मत्वा ते वैपरीत्येन वर्तिष्यंते। परंत्वेवंविधान् जनान् वयमत्र महतावधानेन सूचयामः। यदास्तिकानां ग्रंथावलोकनपुरःसरं पूर्णविचारंविना ये केवलं नास्तिकमतावलंबनं करिष्यंते ते दुर्निवारे महति संकटे पतिष्यंति। आस्तिकानां नास्तिकानांचोभयेषां चमत्कृतिं द्रष्टुं तेषां पुरतोऽयं पंजरोनिवेशितः। अपिचान्याः बहवः वागुराः प्रसृताः संति।

# प्रस्तावना.

देव आहे व धर्म आहे असें जे लोक समजतात त्यांना विचार करण्यास्तव व खरें ज्ञान करून घेण्यास्तव हा नास्तिक मताचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ह्या ग्रंथाचा उपयोग दोन रीतींनीं विचारी लोकांस होणार आहे— ( १ ) जर नास्तिक मत खरें ठरेल तर तें स्वीकारून बाकीचीं सर्व मतें एकदम व दुसऱ्या कोणालाही न भितां सोडून द्यावींत; आणि ( २ ) जर नास्तिक मत खरें नसेल तर त्याचें योग्य प्रकारें व शास्त्ररीतीनें खंडन करून आस्तिक मत बळकट करावें. देवाच्यासंबंधानें आस्तिकमत व नास्तिकमत ह्या दोहोंशिवाय तिसरें मत संभवत नाहीं. ह्यास्तव ज्यांस आस्तिकमत खऱ्या प्रकारें समजून घेण्याची व त्या मतास बळकटी आणण्याची इच्छा असेल त्यांनीं नास्तिक मताचा अवश्य विचार केला पाहिजे. जर कोणा आस्तिकवादीस नास्तिकमत खंडन करितां येत नसेल व तो आस्तिकमतच खरें आहे असें आग्रहानें धरून बसेल तर तो अविचारी व मूर्ख समजला पाहिजे, व तो जें ह्मणेल त्यास किंमत नाहीं असें समजावें. मात्र अशा मनुष्यानें जगांत जे बहुत अज्ञानी आहेत त्यांस, आपणास बरोबर सिद्ध करितां न येण्याजोगें मत प्रसिद्ध करूं नये. कारण जगांत बहुतेक लोक मेंढरांप्रमाणें असून त्यांतला जसा एक दांडगा मोहोरप्या पुढें होऊन त्यानें डोंगरावरून खालीं उडी टाकिली असतां त्याच्या पाठी मागून बाकीचीं मेंढरें डोंगरावरून उडी टाकतात व मरतात तसें ते वागतात. सर्व धर्मांच्या लोकांमध्यें विद्याभ्यास केलेले पुष्कळ लोक असे आढळतात कीं, जसें कोणा भित्र्या मनुष्याला विंचू किंवा साप पाहिला असतां भय वाटतें तसें त्यांना नास्तिक ग्रंथाचें भय वाटून ते त्यास हात सुद्धां लावीत नाहींत किंवा ते ग्रंथ जगांतील लोकांच्या नजरेस न आणण्याची इच्छा करितात. परंतु ते जेथपर्यंत असें करितील तेथपर्यंत अज्ञानांत राहतील, आणि त्यांच्या अशा वागणूकीनें त्यांचे मतास फार कमीपणा येईल.

आणखी येथें एक मोठी खबरदारीची सूचना देणें अवश्य आहे कीं, जगांत पुष्कल लोक असे आहेत कीं, त्यांस आपल्या धर्माचा प्रतिबंध न बाळगितां मोकळेपणानें वागण्यास व चैनबाजी करण्यास पाहिजे

असते. अशा लोकांनीं हा एवढाच ग्रंथ वाचला असतां त्यांस असें वाटेल कीं, आपल्या वागणुकीस हा ग्रंथ मोठा आधारभूत व मदत करणारा असा आहे, आणि तसें समजून ते भलतीच वागणूक करूं लागतील. परंतु अशा लोकांना आम्ही येथें ही मोठी खबरदारीची सूचना देतों कीं, आस्तिकवादींचे ग्रंथ पाहिल्याशिवाय व त्यांचा पूर्ण विचार केल्याशिवाय केवळ नास्तिकमत घेतील तर ते फार खाड्यांत पडतील. आस्तिकवाद व नास्तिकवाद ह्या दोहोंसंबंधीं ग्रंथ योग्य प्रकारें व बारीक रीतीनें पाहून ज्यांस जें मत आवडेल तेंच त्यांनीं स्वीकारणें योग्य आहे. आस्तिकवादी व नास्तिकवादी ह्यांची मौज पाहण्यास्तव आम्हीं त्यांच्या पुढें हा सांपळा टेविला आहे व ह्याशिवाय दुसरीं जाळीं पसरलीं आहेत.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. ६६६७४

# उपोद्घातः

एकस्मिन्समयेमहानुष्मोपगमआसीत् । सर्वेजनाःनिदाघसंतप्ताःदैन्ये-नार्तस्वरमकुर्वन् । एवंसतिपत्तनस्थाःकेचनजनाःसुखार्थं द्राक्षबहुबीजादि-प्रभृतिशीतजनकानिफलानिहिमंचासेवन्त । केचनलोकाः अनाच्छादिता-न्रथानधिरुह्यशीतगंधवाहमाघ्रातुं पारेनदि अधिसरोवरंवाअटितुमगच्छन् । अपरेमानवाः वसंतपूजांविधायविप्राणामंगेषुचंदनादिकंसंलेप्यगलेषुसुम-नोमालांचपरिग्राह्य पानार्थं तेभ्यइक्षुरसमाम्रपानकंवावायुसेवनार्थंव्यज-नानिचैवंविधान् पदार्थानददुः । अपरेकेचनपुरुषाः उपवनं गत्वावृक्षाणां घनच्छायामुपविश्यतत्रोत्पततांजलयंत्राणां शिशिरतरान् तुषारकणान् स्वांगेषु अगृह्णन् । एतादृशे समये ममाप्येवमिच्छाभूत् । यदुप-शल्यारण्ये वृक्षाणां घनच्छायं निर्मलोदकमस्ति । एवंविधे शांते सुरम-णीयेच स्थाने कतिचिद्दिनानि वस्तुं गंतव्यमिति । अतः उपसप्तक्रो-शमात्रं एकंस्थलमस्ति तत्र निर्वाहपरिमितं साधनं परिजनान् शास्त्रिणंच गृहीत्वाऽगच्छं । तत्र पंचषान् दिवसान् इयत्सुखमनुभवं यत् तत्स्थानं झटिति न मोच्यमित्याभातिस्म । तत्रैवंसति एकस्मिन्वारे मध्यान्हवेला-यां शास्त्री अहंच विवदमानौसन्तौ स्थानरमणीयकतया पवमानातिशी-तत्वेनच ममाक्षिणी निद्राव्याकुलेऽभूतां । तदानीमहंकिंचित्विश्रांत्यर्थं शय्यायांयावदपतं तावन्निद्रावशमगच्छं । मयिनिद्राति यश्चमत्कारज-नकः स्वप्नोऽपप्तत् उत्थाय तमेवं शास्त्रिणं अकथयम् तच्छ्रुत्वा तेपि साश्चर्यमनसोभूत्वा स्वप्नस्थकथां निर्णेतुं कुंठिताः संतस्ताः कथाः विद्वद्भिः विचारणीयाः संतीत्यब्रुवन् किंचायं स्वप्नः लोकेषुप्रसिद्धिं प्रापि-तश्चेत् महती चर्चा भूत्वा ततः महालाभजनकाः उपायाः भविष्यंति । स्वप्नेदृष्टाः इत्थंभूताः कथाः नास्मिन्नयं तथापि बहुशः प्रधानाः कथाः स्मृतिपथमायांति तास्तुयथा—

अहंरम्यधर्मशालस्थ इति स्वप्नेऽपश्यम् । तत्रकश्चनागच्छत् । सगौरः उष्णीषहीनः लुंचितकेशः कृष्णकवचवेष्टितांगः शुभ्रचैलवेष्टितपश्चार्धः यष्टिधरः धृतोपानद्विशेषश्चासीत् । समामवोचत् यदहमतीवदूरात् पश्चिमदिक्तः अतीवागाधानर्णवानुल्लंघ्य हिंदुस्थानस्थाः विद्याः द्रष्टुमागत इति । सनरःभाषणपद्धत्याचाकृत्या गंभीरो विचारीचेति मे भासतेस्म । तस्य ममच भाषणं कया भाषयेति नस्मर्यते । किंतु संस्कृतभाषया महाराष्ट्रभाषया वा नाभूदियदेव स्मर्यते । समामपृच्छत् यद्भवंतः के ? कुत्रत्या ? किंकुर्वंतः ? किमधीतवंतः इति । तदाहं तेभ्यः प्रश्नोत्तराण्यददां । ततस्तेऽब्रुवन् यन्मयाएतद्देशीयज्ञानवताभाव्यं । तदर्थंममभवद्भिः यथाशक्ति साह्यकारिभिर्भवितव्यं । तथास्त्वित्यहमवोचं । अथते रथमारुह्य भोजनार्थं गच्छामीत्युक्त्वाद्विमुहूर्ताभ्यंतरे पर्यावर्त्तेरन् । पश्चात्च्छास्त्रचर्यामाविष्कुर्वद्भिः तैः उदंतः निष्कासितः । स यथा अस्मिन्जनपदे लोकाः ईश्वरोस्तीति मन्यंते नवेति । ईश्वरास्तित्वंचेत् तस्य के गुणाः संति जीवोविद्यतेनवेति । किंच मृते देहे जीवोभवतिवानवेति । भवतितार्हि मरणोत्तरं तस्य स्थितिः का भवति । किंच जीवस्येश्वरेण सह संबंधोऽस्तिनवेति । तदा तत्प्रश्नसमीचीनत्वंपर्यालोच्येमे विद्वांसस्संतः मया अल्पमत्यादीयमानानिप्रश्नोत्तराणि संमन्वीयुर्नवेति शंका मम संप्राप्ता । किंच पूर्वोक्तप्रश्नविषयक ज्ञानं प्रथमं तेभ्योसंपाद्नीयमितिमनसिकृत्याहंप्रार्थयेयं । यन्मय्यनुकंप्यभवंतः मां प्रश्नोत्तराणिकथयंतु इति । तदनुरोधेणतैर्यत् कथितंतद्यथाइद मनुनुभूयमानंजगत् धर्मसमुदायात्मकास्ति । तद्यथा—पाषाण इति पदार्थे वर्णभारपरिमाणविभाज्यत्वकठिनत्वादिधर्माः संति । एतद्धर्मसमुदायएवपाषाणोस्ति । एतत्पूर्वोक्तधर्माःपृथक्कृताश्चेत् किमवशेक्ष्यत्येवं गृहीतुं किमपिकारणं न दृश्यते । प्रतिपदार्थं विद्यमानधर्मानुरोधेन तत्रतत्रक्रियाः फलंति । यथा—अग्निः पदार्थान्दहति । सजातीयधर्मिभिः सजाजीयाः व्यापाराः घटंते यथा द्वावर्भकौदृष्टौचेत् तयोरदनपान

रोदनहसनादिक्रियाणांतौल्यं भवति । एवं जडाः चेतनाश्च स्वस्वधर्मानुसारेण व्यापारं कुर्वंति तस्मात् सर्वेषां योग्यता समानैव । अर्थात् तेषां न्यूनाधिकभावोमूलक्तः नास्त्येव ।

ईश्वरास्तिक्यं मत्वा तदर्थं यानि प्रमाणानि उपन्यस्यंते । तान्ययोग्यानि । येभ्यः नियमपूर्वकं विवक्षितं कार्यं संजायते । तेषां केनचित्कर्त्रा भाव्यमिति लोकाः मन्यंते । जगत्सु कानिचित् कार्याणि अमुकेन परिणामेन घटयितव्यमिति इष्टसिद्धिं सपादयितुमर्हंति । एतस्मादनेन जगता सकर्तृकेणांवश्यं भाव्यमिति । एतदर्थंतएवंदृष्टांतयंति यत् घटीयंत्रे विवक्षितकालेन विवक्षितमंतरमतिक्रांतौ भ्रमंतौ कंटकौ अटतः नियमेन वादनं कुरुतः तस्मात् घटीयंत्रं सकर्तृकमवश्यमास्ति । इदानीमेवं प्रकारकमनुमानं व्यभिचारि अस्ति । यतः निर्दोषमनुमातुं वाक्यद्वयापेक्षास्ति । ताभ्यां तृतीयमनुमानवाक्यं सिध्यति । यथा–

१ प्राणिमात्रमन्नमत्ति
२ व्याघ्रोऽयं प्राण्यस्ति
३ तस्मादयं व्याघ्रोऽन्नमत्ति[१]

एवंरीत्याऽव्यभिचारी अनुमातुमेवंनियमः यदादौ समुदायविषयकं अस्तिनास्तीतिप्रकारकं ज्ञानं कथ्यते । तदेव समुदायांतःपाति व्यक्तिविषयंक अस्तिवानास्तीति वक्तुं शक्यते । पूर्वोक्तोदाहरणे प्रथमवाक्ये प्राणिमात्रं नाम प्राणिनां समुदायविषयकअन्नमत्तीति कथितं । द्वितीयवाक्येच व्याघ्र इतिव्यक्तिः पूर्वोक्तसमुदायांतर्वर्तिन्यस्तीत्येवमुक्तं । एतस्मात् पूर्वोक्तनियमानुरोधेनैवमनुमानं भवति । यत्

---

१ **टीप**—एतद्वाक्यत्रयं न्यायवाक्यमिति ज्ञातव्यम् । तत्रप्रथमवाक्यंनाम यथा प्राणिमात्रमन्नमत्ति इदं बृहद्वाक्यां द्वितीयवाक्यं यथाश्वः प्राण्यस्ति इदं लघुवाक्यं । तृतीयं वाक्यं यथा ऽश्वो ऽन्नमत्ति इदमनुमानवाक्यं । लघुवाक्यार्थज्ञानं विना बृहद्वाक्यार्थज्ञानं न संभवति । अत०बृहद्वाक्यार्थज्ञाने अनुमानवाक्यार्थस्यांतर्भावानुमानवाक्यंवैयर्थ्यमेवेति ज्ञातव्यम् । यदि च लघुवाक्यार्थज्ञानमादौ नास्तीति चेत् बृहद्वाक्यस्य मिथ्यात्वं प्राप्तमिति कृत्वा नानुमानं प्रमाणसाधनं । . . . . . . . . . . . .

व्याघ्रोन्नभक्षकोऽस्ति । अत्र प्रथमद्वितीययोरन्यतरद्वाक्यं तथ्यं न स्यात् तर्हि अनुमानं सदोषं भविष्यति । यथा—

१ पशुमात्रस्य विषाणानि संति

२ अश्वः पशुरस्ति

३ तस्मादश्वस्य विषाणे स्तः

अत्रानुमानवाक्ये दोषस्य कारणं प्रथमवाक्यं सदोषमस्तियत् अश्वहस्तीत्यादयः पशवः अशृंगाः संति । तस्मात् केषांचित् पशूनांशृंगाणि संतीत्यनुक्त्वा पशुमात्रस्य शृंगाणि संतीति सामान्योक्तिरयोग्या । तथैव यद्येवमुक्त यत्

१ सैंधवमौषधमस्ति

२ अश्वः सैंधवोऽस्ति

३ तस्मात्सऔषधमस्ति

अत्रानुमानस्य व्यभिचारित्व एवं हेतुरस्ति यत्प्रथमवाक्ये गृहीत सैंधवशब्दस्य योऽर्थोऽस्ति स एवार्थो द्वितीयवाक्ये नास्ति। जगतां कर्त्ता विद्यत एवं पूर्वोक्तरीत्या अनुमातुं उत्तरत्र लिखितवाक्ययोः आदौ सत्यतानिश्चेतव्या । १ यद्यद्वस्तुभ्यः नियमितकार्यसिध्यर्थं व्यापाराः घटंते तत्तत्पदार्थानां कश्चित्कर्त्ताभवति ।

२ जगत्सुपदार्थाः नियमेन कार्यं साधयितुं व्यापारान् कुर्वंति अत्र प्रथमंवाक्यं सत्यापयतुं यद्यत्पदार्थेभ्यः नियमेन कार्यसिध्यर्थंक्रियाभवति तेषांकर्त्ताऽस्ति एवंनिर्णयोऽपेक्ष्यते । यथा पर्जन्यः नियमेनपतित्वा धान्यंजायते । सूर्यः नियमेनाटन् अहर्निशंभवतीत्यादि । अस्मिन्नुदाहरणे पर्जन्यसूर्योत्पादकः कश्चिदास्तिवानवेतिनज्ञायते । तस्मात् यावत् इदंनज्ञायते तावत् प्रथमवाक्यं सत्यंनभवेत् । अतोनुमानं सत्यमित्यपि वक्तुंन शक्नुयात् ।

केचन जनाः एवंब्रुवते।यत् ब्राह्मणानांवेदे यवनानां कुराणाख्ये ख्रिस्तानां बैबलाख्ये एवंविधधर्मपुस्तकेषु ईश्वरास्तिक्यं कथितमतईश्वरोऽस्ति।

तत्रैवं शंक्यते । तत् पुस्तकस्य सत्यनिश्चयमंतरा तत्प्रामाण्येन ईश्वरास्तिक्यं नसेत्स्यति ।

ब्राह्मणा आहुर्यत् वेदोऽनादिर्तस्य कर्ताचनास्ति । तेषामिदंमतंमिथ्यास्ति । यतः पूर्वोक्तरात्धांतस्य सत्यत्वायकिंचिदपि स्वतंत्रं प्रमाणं नास्ति । ख्रिस्तादिकेचनजनाएवं ब्रुवंति यदस्माकं धर्मपुस्तकानि साक्षादीश्वरेण प्रसिद्धिं नीतानि । तथापीदं निश्चेतुं ते यथायोग्यं स्वतंत्रं प्रमाणं दर्शयितुंनशक्नुवंति । तस्मादिमानि सर्वधर्मपुस्तकानि केनचित्धूर्त्तेनवापिशुनेनच स्वार्थसिद्धये रचितानि । तत्रत्यकथाः विश्वासानर्हाः । यथा मनुजकृतग्रंथेषु स्खलनं दृश्यते तथा तेष्वप्यस्ति । तस्मात्सर्वाणि धर्मपुस्तकानि प्रामाण्ये काममपियोग्यतांनार्हंति । तेभ्यः हितंतुनास्त्येव । प्रत्युत लोकानां विपरीतं ज्ञानं प्रदाप्य तेषां निरर्थकः कालः येन गच्छेत्तं पंथानं तानि पुस्तकानि प्रदर्शयंति । केचनजनाएवंभाषंते । यत् ईश्वरास्तित्वे बहुमतानुकूल्यमस्ति । अत ईश्वरेणभाव्यं । तर्हीदं भाषणमतीवाप्रयोजकमस्ति । यतोऽत्यल्पसमयात्प्राक्प्रायशः बहवो जनाः पृथ्वीनभ्रमति सूर्योभ्रमतीत्यब्रुवन् । परंतु ज्योतिःशास्त्राधारेणैतत् स्पष्टं निश्चितं यदिदं मतं सदोषमिति । एतस्माद्विद्वद्भिरमुकमस्तिनास्तीतिवा प्रतिपादिते सति तत्सत्यमसत्यमितिवा ननिर्णयमर्हति ।

केचनैवंब्रुवते । यदिनामेश्वररूपः पदार्थोनभवेत्तर्हि ईश्वरविषयिणी कल्पना जगत्सु मूलत एव नस्यात् । किंचेश्वर इतिशब्दोऽपिभाषासुन प्रसिद्धिं प्राप्नुयात् । इदं भाषणं शुष्कं बालिशप्रायं चास्ति । यतः जगत्स्वविद्यमानानां बहूनां पदार्थानां नामान्युपलभ्यन्ते । यथा खपुष्पशशविषाणवंध्यापुत्रादयः शब्दाः सन्तोऽपि तेषामर्थाः न लभ्यन्ते ।

जगतिसाधारणतयैवं परिदृश्यते यत् यस्यातीवमहत्वमथवा लोकोत्तराचकीर्तिरस्ति । सलोकैर्झटित्यवगम्यते । तस्माद्यदिजगतांनिर्माता सर्वशक्तिमान् सर्वज्ञः ईश्वरोभवेत्तर्हि स लोकानां सौलभ्येनज्ञानगोचरःस्यात् । ये पुरुषाः अविद्वांसोऽथवामृत्योरन्यस्माद्दुःखाच्चभयमादधानाःसन्ति । ते-

रीश्वरः सम्यक्तया न ज्ञातस्तथापीश्वरो नामाकश्चिदस्ति । किंचसोऽस्माकंदुःखंनिवारयति । एवंज्ञात्वास्वयंसमादधते । बहवोजनाः स्वदुःखशमनार्थं ईश्वरंप्रतिवरंप्रार्थयन्ते । पश्चात् काकतालीयन्यायेनयदितेषां दुःखनिवारणं जातं । तथापि पूर्वोक्तवरेणैवभगवान्ममदुःखमनिवारयदितिजानन्ति । ततःशतशोजनाःतमनुसरन्ति । एवंरीत्येश्वरविषयकंमोहजालं प्रसृतं । किंचयेषां याचितवराविरुद्धं भवेत् । तर्हि ते विचारशून्यत्वेन पूर्ववदीश्वरविषयकं निश्चितमतं किमप्यशिथिलयंतःस्वदैवमुपालभंते ।

पृथिव्यां लोकेषु प्रसिद्धिंगताः बुद्धिमंतो नैय्यायिका अभवन् भवंतिच ते प्रायशःनास्तिकाःभवंतीत्येवंदृश्यते ।

कश्चिच्छिशुर्यदि जन्मारभ्यैवं प्रकारेण संस्थापितः यत् तस्य देव इति शब्दःकर्णनालंकुपादथवा देवसंज्ञकं पदार्थं तस्य दृष्टिगोचरंनानयेत् देवविषयकंव्यापारमपि न संपादयेत् । किंच जागतंदेवेतरज्ञानं दत्वा यथासमहाविचारशीलो भविष्यति । तथा तस्मै विद्या अध्यापिताचेत्तस्य यावज्जीवं कदापि ईश्वरास्तिक्यं न भासेत । तस्येश्वरापेक्षापि न भवेत् ।

जगतोस्तित्वाय चालनार्थंच ईश्वरनास्तिक्ये गृहीते काप्यनुपपत्तिः न आपतेत् । यतोऽधुना जगत्सु ये पदार्थाः ईश्वरास्तिक्यकल्पनायां सत्यां यथावस्थिता स्तथैव ईश्वरनास्तिक्यकल्पनायां संति एवंवक्तुं अनुपपत्तिः का । नकापीत्यर्थः ।

जगतांनिर्मातेश्वरोऽस्तीति गृहीते ईश्वरस्याप्यन्यः कश्चित्कर्त्ताऽस्तीति कुतो न मंतव्यं । यदितथा मंतव्यं तर्हि ईश्वराःकति संतीतिनिर्णयोनस्यात् । किंचतथानमंतव्यं तर्हि मूलतएव जगतां निर्मातेश्वरोनास्तीतिस्वीकृते का क्षतिः ।

कस्यापिपदार्थस्यज्ञानार्थंप्राणिनां इंद्रियाणि साधनानि संति । ईश्वरः चक्षुरादींद्रियाणामन्यतमस्यापि विषयोयदिनभवति तर्हि इंद्रियाऽविष-

याः पदार्थाः यथामूलतएव न संतीतिवक्तुंयुज्यते । तथेश्वरः मूलतएव नास्तीतिवक्तुंयोग्यं । यदि परमार्थतयेश्वरोवर्तेततर्हितस्य सृष्टिवत् इंद्रिय-गोचरतां प्राप्तुं कानुपपत्तिः । कश्चित्यदि ब्रूयात् परमेश्वरदर्शनं योग्यतां विना नभवति तर्हीदंभाषणं वंचकतार्हं । यतः केनापींद्रियेणकस्यापिप-दार्थस्यज्ञानंयोग्यतांविनानभवतीत्यत्रपरमेश्वरंविनाऽन्यदुदाहरणमेव ना-स्ति । नरस्य योग्यता कीदृश्यपिभवेत् तथाप्यवलोकनीयः पदार्थः तस्यदृष्टिगोचरः स्यादेवेति ।

ईश्वरोनाम्नाकश्चिदस्तितेनेदंजगन्निर्मितं । तर्हि जगतां स्थितिंव्यापारां-श्चदृष्ट्वा तस्य चातुर्यमतीवन्यूनमितिभवति । इतिन प्रत्युत तेन परमा-वधिबालिशेनभाव्यमितिनिर्णीतं भवति । मनुष्ये स्वस्थितिंविमृशति सति जन्मारभ्य मरणपर्यंतं कतिदु:खानि भोग्यतां प्राप्नुवंति । किंच जगत्सुयैरन्यैः पदार्थैः स्वसंबंधःपतितितेऽतीवक्षुद्राः पीडाजनकाश्चसंति । तेषुविचार्यमाणेषुएवंविधजगतां कर्त्ता चतुर इति स्वीकरोऽअतीवलज्जा-स्पदमस्ति । जगतां कर्त्तेश्वरःसत्यंयदिभवेत्तर्हि निर्भयत्वेन निर्लज्जत्वेन निःपक्षपातित्वेनास्मदग्र आगच्छेच्च तर्हिसोप्येवंस्वीकुर्यात् यत् जग-त्स्वतीवनीचप्राणिनः यादृक्चातुर्यमस्तितादृग्ममनास्तीति मनसिकृत्य लज्जापारदृश्वा भवेत् । यतःकश्चिद्यदिएतादृशंजगत् निर्मास्यतियत्तत्र दुःखस्यनामापिनास्तितर्हि एवंविधजगत्कर्त्ता इदानींतनजगत्कर्त्रीश्वरापेक्ष-याऽधिक चतुरो भवेद्वान । तस्माद्यदीश्वरः भवेत् तर्हि स सर्वज्ञोस्ती-त्येवममत्वाऽसर्वज्ञोस्तीत्ये वं भाषणं सयुक्तिकं योग्यं च भवेत् ।

इदानीं जगत्सु यावान्योज्ञानसमुदायः ज्ञेयोऽस्ति । सः केनाप्येकेन ज्ञातुमशक्यः । किंच मानवः एवंवेत्तियदधुना जगति ज्ञानसमुदायः मनु-ष्यबुद्धिविषयोऽस्तितदपेक्षयाऽतीवमहान् मनुष्यज्ञानाऽविषयः ज्ञानानि-धिरस्ति । तर्हि यथा कश्चिद्वैय्याकरणोऽस्तिचेत्सः ज्योतिर्विदं परीक्षितुंन शक्नोति । तथा अल्पज्ञमानव ईश्वरः सर्वज्ञोस्तीतिनिर्णेतुं कथं शक्नुयात् ?

ईश्वरः सर्वशक्तिमानिति भाषणं न सम्यक् । यतः जगतां रचनांदृ-

ष्ट्वा ईश्वरेणाल्पशक्तिमताऽतीव दुर्बलेनचभवितव्यं । पूर्वोक्तदृष्टांते-नैवमाविर्भवतियत्र्हि जगत्सुदुःखानि संति । तस्मात् सर्वशक्तिमत्वे-नस्वीकृतस्येश्वरस्य निर्दुःखं जगत् निर्मातुं सामर्थ्यंनास्तीतिभवति। सामर्थ्ये सत्यपि तथाविधंजगन्ननिर्मितं एवं गृहीतंचेत् स क्रूरत्वस्य प-रांकाष्ठामापन्नः निर्दयश्चेतिवक्तुंयोग्योभवति । एवंविध ईश्वरे विमर्शनं अतीवायोग्यमस्ति तस्य क्रौर्यस्यशास्ता कश्चिन्नास्तीत्यतीवशोचनीयं।

तथैवचेश्वरोऽपरिच्छिन्नइत्यपिनयुक्तम्। यतः अपरिच्छिन्नत्वंनाम यस्य परिच्छेदोनाम अंतोनास्त्येवमर्थो गृहीतश्चेत् अनंतपदार्थस्य कल्पनां सां-तमानवः कदापिकर्त्तुं न शक्नुयात्। किंचानंतो नाम यस्यांऽतोऽस्ति तथापि स न ज्ञायत इत्येवं स्वीकृत ईश्वरस्यांतोऽस्ति परंतु सोऽस्माकं न विदितः । अन्यप्रकारेणैवमप्यर्थो भवितुमर्हति। यत् ईश्वरस्य सां-तत्वं विद्यते न वेति तज्ज्ञानविषयंभवितुं नार्हति । एवमुक्तेऽपि ता-त्पर्यार्थस्तु तथैव भवति ।

तथैवचेश्वरः सर्वव्यापक इति वदंति तदपि न युक्तम् । यतः सर्व-व्यापकत्वं नाम सर्वं व्याप्य विद्यमानत्वम् । यःकश्चित् कांश्चन पदा-र्थान् निर्मिमीते स तान् पदार्थान् व्याप्य कथंतिष्ठत्येतद्विषये दृष्टांतो नास्ति । किंच तादृशी कल्पना मानवमनसि समारोढुमशक्या । अप-रं चेश्वरः सर्वव्यापक इति वक्तुं सर्व इत्यस्य कोऽर्थः स आदौ ज्ञातव्यः। सर्वपदार्थान् ज्ञानविषयीकर्त्तुं मानवस्य शक्तिर्नास्तीत्येवं नानाविधाः विद्वांसःस्वीकुर्वन्ति । तस्माद्यावत्सर्वइत्याकारकः पदार्थो न ज्ञातस्ता-वत् सर्वव्यापकइति शब्दस्यार्थःज्ञातुमशक्यःस्यात् ।

तथैवचेश्वरः स्वतंत्र इत्यपि ब्रुवते तदपि न समीचीनम्।यतः ईश्वरः पदार्थे विद्यमानान् धर्मान् वैपरीत्येनाकरोदित्यस्माभिः कदापि नानुभूय-त । नानाविधलोकानां धर्मपुस्तकेषु परमेश्वरकृतानि लोकोत्तराणि कृत्यानि लिखितानीति परिदृश्यंते । परंतुत्विमानि धर्मपुस्तकानि प्र-माणानीति निर्णेतुं योग्यसाधनानि न सन्ति । किंच तत्र लिखितानि

सृष्टिक्रमविरुद्धानि कार्याणि सत्यानीति विश्वसितुं तादृशं योग्यं कारणं नास्ति । तानि धर्मपुस्तकानि कश्चित्धूर्त्तः स्वार्थतत्परस्तथापि किंचिच्छिक्षितएवंविधः पुरुषः स्वस्य स्वेष्टमित्राणांच स्वार्थं मूर्खजनसकाशात् साधयितुमरचयत् । केचनैवं ब्रुवन्ति यदस्माकं धर्मपुस्तकस्य त्रीणि सहस्राणि वर्षाणि संजातानीति । अन्येचैवं वदंति यदस्माकं धर्मपुस्तकस्य दशसहस्राणि वर्षाण्यभवन्निति । इतरेचैवमाहुर्यदस्माकं धर्मपुस्तकमनादि विद्यत इति । इमानि तेषां भाषणानि तत्तत्धर्मपुस्तकपर्यालोचनयैवमिथ्यानीति निर्णीयंत इत्येवं न । परंतु ज्योतिःशास्त्रभूगर्भशास्त्राद्यर्वाचीनकालिकानुभवेन तेषां मिथ्यात्वं सिध्यति ।

अधुना बहुशः सर्वजनाः एव गदंति यदात्मानामकश्चिदेकः पदार्थः देहेऽस्ति । स देहात्भिन्नः सन् देहनाशेऽपि अविनाशी तिष्ठति । इदमपि भाषणं सस्खलितमस्ति । यथा घटीयंत्रादिकमनेकचक्रादिसंयोगपरिणामात्मकमस्ति । तत्र चक्रादिकंविनाऽन्यः पृथक् पदार्थोनास्ति । तथा प्राणिषु अस्थिमांसचर्मरक्तादयो ये पदार्थाः शरीरे विद्यन्ते । ततः पृथक्पदार्थःआत्मेति नाम न विद्यते । रसायनशास्त्रानुरोधेनैवं ज्ञायते यत् यदा दीपः प्रज्वलति तदा उष्णतया तैलस्य बाष्पं प्राणवायुश्चानयोर्मिश्रणं भवतीत्यनुभूयते । यावत्तन्मिश्रणभवनानुकूलव्यापारश्चलति तावद्दीपः ज्वलति । यदा च तैलस्य बाष्पं न्यूनमथवा प्राणवायोः सामग्र्या ऊनत्वमथवा मिश्रणभवनार्थं यावत्युष्णताऽपेक्ष्यते तदपेक्षयाल्पत्वं संजायते तदा ज्वलनव्यापारप्रतिबंधो भूत्वाऽग्रे तूष्णीं भवति तथा मानवस्य जीवितं नामैकप्रकारकं ज्वलनमस्ति । यावज्ज्वलनक्रियासामग्र्यानुकूल्यं भवति । तावन्मानवः जीवति । एतत्सामग्र्यां न्यूनत्वं संजातंचेत् मनुष्यस्य जीवितव्यापारनिर्वाणं भवति । यदि कंचिद्दीपं प्रज्वाल्य तदुपरि काचपात्रं न्युब्जतया स्थापितं । तदा दीपस्य यादृशी स्थितिः संजायते । किंच निर्वाणपर्यंतं यथा व्यापारः घटते तथा म्रियमाणमनुष्यस्य स्थितिभवनं ततः व्यापारघटनं च दृष्ट्यनुभूतं संजायते ।

मनुष्यो नाम कतिविधानां परमाणूनां समुदायोऽस्ति । तत्समुदायस्य ये धर्मास्त एव धर्माः मनुष्यस्य सन्ति । मनुष्ये मृतेपरमाणुसमुदायरचनायां वैपरीत्यं भवति । पुनस्तेषामेव परमाणूनामथवा तदीयानां केषां तद्भिन्नानां केषांचिन्मिश्रणं योजना च योग्यतया क्रियमाणा चेत् तेभ्यः प्राणी संजायते । यथा चक्रपाणीनामा प्राणी मृतः पश्चात्तस्य चूर्णं विधाय तच्चूर्णमुदके क्षिप्तं चेत्तेषां परमाणूनामेवंविधा विलक्षणा रचना संजायते यत्ततः जीवत्प्राणिव्यापाराः परिदृश्यंते ।

कश्चिदेवं यदि ब्रूयाद्यत्सुखदुःखानुभविता यः शरीरेऽस्ति स आत्माऽस्ति । तर्हीदमपि न सम्यक् यत् परमाणूनां रचनया परिणममानः देहस्तस्यैष धर्मः सुखदुःखानुभवनमिति । यदा च मनुष्यस्य शरीरे पक्षघातसंज्ञको वायुर्भवति । तदा पूर्ववत्तेन सुखदुःखं नानुभूयते । एवमप्युदाहरणं जगत्स्वानुभवारूढमास्ति कस्य चिन्मनुष्यस्य कपोले पणमात्रं भागं विहायान्यत् सर्वं शरीरं पक्षवायुदूषितमासीत् । तदाऽत्तुं तुं तस्मै संज्ञपनीयं भवेत्तर्हि तस्य कपोले पणमात्ने भागे संज्ञां दत्वा कथयंतिस्मान्यत्सर्वमंगं स्पर्शज्ञानशक्तिहीनमभवत् ।

मनुष्यस्य देहेऽस्वास्थ्यं केनापि प्रकारेण भवति चेत्तदौषधं दत्वा पूर्ववत्कर्तुं शक्यते । वैद्यः मृत्तिकासदृशं किंचिच्चूर्णमत्तुं ददाति तेन देहे सुखं जायते । तथैव च विषमयं चूर्णमत्तुं दत्तं चेत्तेन शरीरे दुःखं संभवति । एतेभ्यः जडपदार्थेभ्यः सकाशात् सुखदुःखमुत्पद्यते । सुखदुःखानुभविता कश्चिद्देहात्पृथक् नास्ति । कश्चिद्व्यापारोऽखंडतयाऽथवा पतितेऽपि खंडे तस्मिन् ज्ञानविषयतामप्राप्ते सति सातत्येन घटमानश्चेदारभ्यांतपर्यंतं सर्वोऽपि व्यापार एक एवेति मनुष्यस्य भ्रांतिर्भवति । यथा दीपे ज्वलति प्रतिक्षणं तैलबाष्पं भिन्नं भिन्नं भवति । तद्भूतवायुस्थप्राणवायोः पृथक् पृथगंशैर्मिश्रितं जायते । तथापि दीपद्रष्टुरेवं भाति यदारभ्यांतपर्यंतं दीपस्य ज्योतिरेकमेवेति । एवमस्मिन्शरीरे ज्वलनव्यापारेऽखंडतया चलति सति शरीरे प्रथममारभ्यांतपर्यंतं एकः

जीवोऽस्तीति भ्रांतिर्जायते। एतस्मादेवं सिध्यति यल्लोका एवं वदंति 'यज्जीवः यद्यत्कृत्यं करोति तस्य तस्य भारं वहति।' इदं सम्यक् न प्रत्युत नीतिविरुद्धं। यतः भिन्नभिन्नक्षणेषु पृथक् पृथक् जीवाः संभवंति। तस्मादेकस्य जीवस्य कृत्यस्य भारमन्यो जीवः वहति।

अद्यपर्यंतं शास्त्रीयनानाविधचमत्कारान्वेषणेन यांत्रिकशक्तिप्रकाशविद्युल्लतोष्णतालोहचुंबकशक्तीनां प्रत्येकस्वरूपव्यापारज्ञानं संपादितमस्ति। तथा शरीराद्भिन्नः जीवनामकः पदार्थः यदि भवेत् तर्ह्यनेकविद्वद्भिरद्यपर्यंतं कोटिशः मृत्यूनामुदाहरणानि दृष्टानि संति। तथापि मरणकाले शरीराज्जीवो निर्गच्छतीत्येतद्विषये तेकमप्यनुभवं न दर्शयंति। यदा च मानव आसन्नमरणो भवति। तदातच्छरीरस्थरक्तस्य भ्रमणं हस्तपादयोरग्रमारभ्य प्रतिबध्यं सत्पश्चात्रक्ताशयेऽपि रक्तभ्रमणमवष्टब्धं सद्यावद्रक्तौष्ण्यं तावदुरउष्णं भवति। सोष्णता भूतवायौ गता चेन्मनुष्यः शीतो भवति। ततस्तं पृथिव्यां गर्ते क्षिपं त्यथवा दहंति। एतस्मान्मनुष्ये म्रियमाणे सत्युष्णतानिर्गमनं विनाऽन्यव्यापारघटनं नानुभूयते। तस्मादुष्णतां विना जीव इति पदार्थः शरीरे तिष्ठतीत्येतद्विषये कथमपि कदापि नानुभूयते। वयं यदामत्कुणं पोथयामोऽथवा मक्षिकां मशकं च सहसा घातयामस्तदा यद्घटते तेन जीवनामा कश्चिद्देहात्पृथक् इति सिद्धांतस्त्वनुभवविरुद्धोऽस्ति। किंच यदा मार्जारो जीवंतं मूषकं चर्वणमंतरा खादति तदा मूषको मार्जारोदरांतर्मृतस्तथापि मूषकजीवो मार्जारशरीरे कुतो न वसेत्। किंच मार्जारव्यापारेण मूषकस्यः सुखं दुःखंवाकुतो न भवेत्। मार्जारोदरांतर्मूषकेगते तत्र च मृते मूषकस्य जीवस्य किं भवत्यथवा स यदि बहिर्निर्गच्छेत्तर्हि मार्जारशरीरात् कथं बहिरायातीति कोऽपि वक्तुं शक्नुयात् किम्।

किंच वयं केऽपि प्राणिनः स्म इति यद्भासते तन्मिथ्येति कुतो न वक्तव्यम्। एतावदेव न। किंतु अस्मद्भिना यज्जगदस्तीति भाति

तदपि मिथ्येति कुतो न वाच्यम् । यतः स्वेंद्रियद्वारा यज्ज्ञानं लभ्यते तत्सत्यमिति गृहीतुं प्रमाणं नास्ति । प्रत्युत तन्मिथ्येति ग्रहणं सयुक्तिकमिति नेत्रयोः पक्ष्मणी स्वाङ्गुल्याऽवष्टभ्य दीपस्य ज्योतिषि दृष्टिर्निक्षिप्ता चेत् तारात्मकः प्रकाशः दृश्यते । किंच एकस्मिन् पदार्थे पदार्थद्वयं प्रतिभाति । तस्मादंगुल्या नेत्रपक्ष्मण्यवष्टब्धे सति यादृक् लोचनरचना भवति । तादृक् रचना कस्य चित्पुरुषस्य जन्मारभ्यास्ति चेत् तस्य नयनगोचरं वस्तुद्वैविध्यं भविष्यति चेत्सोऽनुभवः सत्य इति वक्तव्यमुतान्यस्य यल्लोचनगोचरं तत्सत्यमिति वाच्यम् । यदि च स यथा स्वानुभवं वर्तेत तदा प्रतिपदार्थं पदार्थद्वयमस्तीत्येवं स्वानुभवेन कृतक्रियासु इतरमनुजैः स पदार्थ एक एवेति स्वानुभवानुसारात् कृतक्रियासु च भेदः न परिदृश्यते। तथाप्युभयोर्मध्ये कस्य ज्ञानं सत्यं कस्य मिथ्येति निर्णेतुमशक्यं स्यात् । बहूनां नृणां यत्प्रकारकं ज्ञानं भवति तत्प्रकारकं ज्ञानं सत्यमस्तीत्येवं भाषणं सप्रमाणं नास्ति । एतद्विषयउपरि सदृष्टांतं कथितमस्ति । दर्शनशास्त्रे त्वेवं प्रतिपादितं यत् एकरूपविषयकमेव ज्ञानं भिन्नभिन्नपुरुषाणां भिन्नभिन्नप्रकारकं संजायते । एवं यदींद्रियद्वारा भविष्यज्ज्ञानं वंचयितृ विद्यते इंद्रियं च विश्वासानर्हमस्ति च । तस्मादिदानींतनज्ञानानुभवेन जगत्सत्यमिति वक्तुमयोग्यम् । किंच यदा मनुष्य आसन्ननिद्रो भवत्यथवाऽऽसन्नमृत्युर्भवति । तदा जगत् शनैः शनैर्नश्यत्सत् परिणामेऽत्यंताभावमाप्नोति । तदा विशेषतः मृतपुरुषेण जगदस्तीति वाच्यमुत नास्तीति । साधारणतः स्वप्नस्तु किंचित्कालमात्रमस्ति । तथापि स्वप्नादुत्थाय जाग्रदवस्थायां स्वप्नस्थाः पदार्थाः मिथ्येति लोकाः वदंति । तर्हि जाग्रदवस्था चिरस्थायिनीति कृत्वैव जाग्रदवस्थाजन्यज्ञानेन जगत्सत्यमित्यनुमानं सयुक्तिकं न भविष्यति । कश्चित्पुरुषो यदि जन्म प्राप्य एकघटिकां जीवित्वामृतः । तस्मिन् मृते तस्यात्माऽस्तीत्येवं मन्यते तर्हि यथा स्वप्नादुत्थितेन पुरुषेण स्वप्नस्थाः पदार्थाः मिथ्येति गृह्यंते । तथा मृतस्य

पुरुषस्य घटिकामात्रं दृष्टं जगत् मिथ्येति भासेत वानवा । एतस्माद्वयंस्म इति यद्भासत इदं सत्यमिति निर्णेतुं प्रमाणं नास्ति ।

एवं रीत्या समाप्ते स्वप्ने महाध्वनिरश्रूयत । तं श्रुत्वा सहसा अहमजागरम् । यावच्च पश्यामि तावन्महदभ्रेणाकाशमायतमासीत् । हिममयः पर्जन्योऽपतत् । पर्जन्यहिमयोरतीववर्षणमभवच्च । तदा चापश्यम् यन्मत्समीपे शास्त्रिणः पुस्तकं वाचयंत आसांचक्रिरइति । तानहमपृच्छम् महाध्वनिर्भवतां कर्णपथमायातः किम् । तदा तेऽवदन् यन्मदग्र एका महती विद्युत् सहसा प्रकाश्य महाघर्घरध्वनिरभवत् । सौदामिनीकडकडाय्य च पुरतः पततिस्म । तत्र नानाविधाः विद्वांसः संदह्याम्रियंत । पश्चादहं स्वप्नस्थवृत्तांतं शास्त्रिभ्यो निवेद्य तैः सह व्यवदं । तदा यद्यच्छंके तत्तत्समाधातुं तेऽशक्नुवन् । ततो मयाऽस्वास्थ्येन निराभिमानितया निःपक्षपातित्वेन सूक्ष्मरीत्या सत्यान्वेषणबुध्या च विचारिते सत्येवं वक्ष्यमाणं मनसि समागतं ।

मनुष्यस्य सत्यज्ञानसंपादनार्थं प्रत्यक्षप्रमाणं विनान्यत्साधनं नास्ति । ये त्वज्ञानिनस्तेऽनुमानस्य प्रमाणतामवगच्छंति । परंत्वनुमानेन नित्यं सत्यमेवज्ञानं भविष्यतीत्येवं नियमो न । प्रत्युतानुमानजन्यं ज्ञानं सत्यं मिथ्या वेति सततं ज्ञातुमशक्यं च । व्यवहारे प्रायशः बहुकार्येषु क्रियमाणमनुमानं कथं व्यभिचरतीति प्रतिक्षणमस्माभिरनुभूयत इत्येवं न । अपि तु विदुषां पुरुषाणां मतान्येकस्मिन्नपि विषय एकदैव भिन्नानि संति । किंच एकस्मिन्काले यादृशानां पुरुषाणां मतानि विद्यंते अन्यस्मिन्काले तादृशानां लोकानां मतैर्विरुद्धानि जायंते । अपरं च वयं विद्वांस इति मन्यमानस्यैकस्यापि पुरुषस्य मतं कालांतरे कथं विरुद्धं भवति । एतत्सर्वं तेषां ग्रंथसकाशादथवा ग्रंथानामावृत्तितः स्पष्टं जायते । किंच तेषां तेषामनुमाने कथं व्यभिचारो भवतीति ज्ञायते । जगत्स्वनंताः विषयाः संति । तेषु च ये बहवो वादाः प्रभवंति । तेषां मूलबीजं त्वनुमानप्रमाणमस्ति । तस्मा-

त् सत्यज्ञानं संपादयितुमिच्छता पुरुषेणानुमानं प्रमाणतया कदापि न स्वीकरणीयम् ।

ईश्वरस्तु मूलत एव नास्ति । जगतां कर्ता कश्चिदस्तीत्येतद्विषये प्रत्यक्षं न भवति । किंच जगतां कर्त्रा भाव्यमित्यस्यापेक्षापिऽनास्ति । यदि च जगतां कर्ता मंतव्योऽस्ति । तर्हि कर्तुरप्यन्यः कर्ताऽस्त्येवं कुतो न मंतव्यम् । यदि चानवस्थादोषः प्रसज्यतेऽतः कर्तुरन्यः कर्ता न गृह्यत इति चेत् तर्हि प्रथमत एक कर्ता मंतव्य इत्यत्र केन वा मस्तकोपरिभारो निक्षेपितः । प्रत्यक्षतयाऽनुभूयमानमिदं जगद्विधर्मसमुदायो विद्यते । भिन्नभिन्नपदार्थेषु भिन्नभिन्नाः धर्माः संति । पदार्थमात्रं यथाधर्मं व्यापारयति । तस्मिन् धर्मेऽथवा तस्मिन्व्यापारे वैपरीत्यं कर्त्तुं प्रत्यक्षतोऽनुभूयमानमनुष्योऽथवाऽन्यः कश्चित्प्राणी वा न प्रभवति । अर्थादप्रत्यक्षः कल्पितश्चैतादृश ईश्वररूपः पदार्थः कथं शक्नुयात् ।

ईश्वरस्तु मूलत एव नास्ति । तस्माद्यत्धर्मपुस्तकेषु ईश्वरोऽस्तीति कथितं भवेत्तानि सर्वाणि धर्मपुस्तकान्यनृतानि संति । केचनाज्ञानिनो जनाः धर्मपुस्तकानीमानि पृथक् प्रमाणानि संतीति मन्यंते । परंतु धर्मपुस्तकप्रामाण्यनिर्णयमंतरा तेषां प्रमाणत्वं निरुपयोगि अस्त्येव धर्मपुस्तकानि भीरुन्यूनज्ञानमनुष्यार्थं संति । येषां सत्यज्ञानस्यापेक्षा विद्यते तैर्वेदांतशास्त्रं नाभ्यसनीयम् । यतो वेदांतशास्त्राभ्यासेन मनुष्योऽयं पाषाणः संजायते । किंचाग्रिमजगतोऽत्यंताभावात्तत्र सुखं तु नैवमिलति । परंत्वास्मिन् जगति यल्लभ्यं सुखमस्ति तेन सुखेन स वंचितो भवति । एवमस्माकं हिंदुस्थानदेशे शंकराचार्यमध्वाचार्यवल्लभाचार्यरामानुजाचार्यैः क्रमशो द्वैताद्वैतशुद्धाद्वैतविशिष्टाद्वैतानि मतानि पाखंडतया रचयित्वा अल्पबुद्धिविचारशून्यव्यसनिश्रद्धाजडाः पुरुषाः कारणमंतरा महति व्यसने संपातिताः । देशकल्याणमिच्छता पुरुषेण जग-

त्सु विद्यमाना देव इति कल्पना यथा नंक्ष्यति सत्यसुखस्य ज्ञानं च भवेत् तथा कर्तुं यतनीयम् ।

देहे देहाद्भिन्न आत्मा मूलत एव नास्ति । इदं प्रत्यक्षतयाऽनुभवारूढमस्ति । तस्माद्देहनाशे कश्चिदात्मेति पदार्थो नावशिष्यते । पुनर्जन्म पुनर्मरणं च नास्ति । देह आत्मा चेति द्वयोः पदार्थयोरभावात् । स्वर्गः नरकश्चेति मूलत एव पदार्थौ न स्तः । तथैव धर्माधर्मौ नीतिरनीतिश्च दृष्टमदृष्टं च पुण्यं पापं च शुभमशुभं च शुचित्वमशुचित्वं च भक्ष्यमभक्ष्यं च श्राद्धं पक्षश्च शौचमशौचं च कीर्तिरकीर्तिश्चेत्यादिसर्वे पदार्थाः कल्पिता अनृताश्च संति । देहस्य हस्तपाद्यवयवान् छित्वाऽथवा शरीरं छित्वाद्दृष्टं चेदेवमनुभूयते यन्मस्तके ज्ञानोत्पादकाः तंतवः संति । अहमस्मीति भानं सुखदुःखानुभवितृत्वं विचारयितृत्वं चेत्यादयो धर्माः ज्ञानतंतूनां संति । ते तंतवस्तु स्वस्थितौ संतः यावद्यथा योग्यं तेषां रक्तं प्राप्नुवंति । तावदहमिति पदार्थः सुस्थोऽस्ति । तंतूनां विशेषप्रकारेण पीडाऽथवाऽव्यवस्था संजाता । किंच तेषां रक्तं न संप्राप्तं तदा अहंतायाः ज्ञानं नष्टप्रायं भवति । इदमेव मरणं । तस्माद्वेदांतशास्त्रविदो यथा जानंति तथात्मेति पदार्थो नास्त्यत एव भूतपिशाचमणिमंत्राभिचारादिकं सर्वं मिथ्या विद्यते । तेषामुद्देशस्त्वयमज्ञजनान् भीतिं प्रदर्श्यधूर्तजनैः स्वोदरं पूरणीयमेवेति ।

प्रकारविशेषेण परिणतो देह एवाहमस्मि । देहस्य यत्सुखं तदेवममेति । देहे नष्टेऽहमपि नष्टः । येनविशेषेण देहः परिणतोऽस्ति । तत्र वैपरीत्ये जातेऽहं नष्टो भवति । देहो यावत्तिष्ठति तावत्स यथा स्वधर्मं वर्तते । अहं नाम देहोऽयं जगति सुखमनुभवितुं समर्थः । तस्माद्यावद्देहस्तिष्ठेत्तावद्यथा देहस्य दुःखं न भवेत्सुखमेव स्यादथवा दुःखमंतरा सुखमप्राप्यं भवेत्तर्हि स्वल्पदुःखेन बहुचिरं च सुखं भविष्यत्यथवा दुःखबाहुल्येनात्यल्पं सुखं लभ्यं स्यात् तर्हि तावद्दुःखं स्वीकृत्य सुखस्यापेक्षास्ति तदा तथा कृत्वा सुखं संपाद्यम् । निष्कर्षस्त्वयम् अस्मि-

न् जगति केनापि प्रकारेण सुखं यथा स्यात्तथा वर्तनीयमिति सदाचरणस्य मुख्यो नियमः । इयमेव मुख्या नीतिरयमेव च मुख्यो धर्मो वेदितव्यः । इत्थमस्मिल्लोकेऽतिशयं सुखं संपाद्य अहंरूपस्य देहस्य नाशभवनमेवमुक्तिरस्ति ।

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ब नारायण
घ. नों. ६६७८

# उपोद्घात.

एके समयीं उन्हाळा कडक पडला होता. सर्व माणसें उन्हाच्या तापामुळें लाहा लाहा करीत होतीं. अशा समयीं शहरांतील कित्येक लोक सुख होण्याकरितां द्राक्ष, डाळिंब, अंजीर, संत्रीं, मोसंबीं, साखर-लिंबू, सरबतें, बर्फ इत्यादिकांचें सेवन करीत होते. कित्येक लोक उघड्या गाडींत बसून गार हवेकरितां नदीकडे अगर तळ्याकडे फिराव-यास जात असत. कित्येक लोक वसंतपूजा करून ब्राह्मणांच्या आंगाला गंधाच्या उट्या लावून व फुलांच्या माळा घालून त्यांना पिण्यास उसाचा रस व आंब्याचें पन्हें व वारा घेण्यास पंखे असे पदार्थ देत असत. कित्येक लोक बागेंत जाऊन झाडांच्या दाट छायेखालीं बसून तेथें उडत असलेल्या हजारी कारंज्याचे गार तुषार अंगावर घेत असत. अशा समयीं मजलाही अशी इच्छा झाली कीं, जवळ अरण्यांत जेथें झाडांची पुष्कळ गर्दी असून उत्तम प्रकारचें पाणी आहे अशा एका शांत व रमणीय स्थळीं कांहीं दिवस राहण्यास जावें. ह्मणून सुमारें सात कोसांवर एक स्थल आहे तेथें निर्वाहा पुरतें सामान व माणसें व एक शास्त्री ह्या प्रमाणें घेऊन गेलों. तेथें पांच सहा दिवसांत सर्व प्रकारें इतकें सुख वाटलें कीं, ती जागा लवकर सोडूं नये असें वाटे. तेथें असतां एके दिवशीं ऐन दोन प्रहरीं शास्त्रीबावा आणि मी वादविवाद करीत असतां जागयाच्या शांततेमुळें व हवेच्या गारव्यामुळें मजला डुकल्या येऊं लागल्या. तेव्हां मीं थोडा वेळ विश्रांति घ्यावी ह्मणून मी बिछान्यावर पडलों, तों लगेच मजला झोंप लागली. मी झोंपेंत असतांना मजला जें एक चमत्कारिक स्वप्न पडलें तें मीं उठल्यावर शास्त्रीबावांना सांगितलें. त्यांनाही त्या स्वप्नाचें आश्चर्य वाटून त्यांतील कित्येक गोष्टींचा उलगडा पडेना, व ते ह्मणाले कीं, त्या स्वप्नांतील कित्येक गोष्टी विद्वानांनीं विचार करण्यासारख्या आहेत, आणि हें स्वप्न लोकांमध्यें प्रसिद्ध केल्यास बरीच वाटाघांट चालेल व त्यापासून कांहीं फायद्याच्या गोष्टी निष्पन्न

होतील. स्वप्नांत एकंदर ज्या गोष्टी घडल्या अगर पाहिल्या त्या इत्थंभूत लक्ष्यांत नाहींत, तथापि बहुतेक मुख्य मुख्य गोष्टी ज्या लांक्ष्यत राहिल्या आहेत त्या येणेंप्रमाणें—

स्वप्नांत मी एका उत्तम धर्मशाळेंत आहें असें मजला वाटलें. तेथें एक मनुष्य आला. त्याचा रंग गोरा असून तो बोडका होता, डोकीला केंश होते, अंगांत काळा डगला होता, पायांत पांढरा चोळणा होता, हातांत काठी होती,व पायांत बूट घातलेला होता. तो मला असें ह्मणाला कीं. मी फार लांबून पश्चिम दिशेकडून मोठमोठाले समुद्र वलांडून हिंदुस्थानांतील विद्या पाहण्यास आलों आहे. तो मनुष्य मोठा प्रौढ व विचारी आहे असें त्याच्या चेहऱ्यावरून व बोलण्याच्या तऱ्हेवरून दिसलें. त्याचें व माझें बोलणें कोणत्या भाषेंत झालें हें लक्ष्यांत राहिलें नाहीं; परंतु संस्कृत किंवा मराठी भाषेंत झालें नाहीं इतकी आठवण आहे. त्यांनीं मला विचारलें कीं, तुह्मी कोण आहांत? कोठें असतां ? काय करितां ? व काय शिकलेले आहां ? तेव्हां मी त्यांस त्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. पुढें ते असें ह्मणाले कीं, मजला ह्या देशांतील कांहीं माहिती पाहिजे आहे, तिजबद्दल मजला तुह्माकडून होईल तितकी मदत करा. मी बरें ह्मणून ह्मटलें. पुढें ते गाडींत बसून जेवावयास जातों ह्मणून सुमारें दोन तास जाऊन परत आले. मग त्यांनीं शास्त्राच्या गोष्टी काढिल्या. त्या अशा कीं, ह्या देशांत लोक ईश्वर आहे असें मानितात किंवा नाहीं, ईश्वर असल्यास त्याचे काय गुण आहेत, जीव आहे किंवा नाहीं, व प्राणी मेल्यावर जीव असतो किंवा नसतो, असल्यास मेल्यावर जीवाचें पुढें काय होतें, व जीवाचा ईश्वराशीं कांहीं संबंध आहे कीं काय ? तेव्हां त्यांचे प्रश्न उत्तम रीतीचे आहेत हें पाहून ते विद्वान् असून मीं आपल्या अल्प मती प्रमाणें प्रश्नाचीं उत्तरें दिलीं असतां तीं त्यांना पटतील किंवा नाहीं ह्याजविषयीं मजला शंका आली, व सदहू प्रश्ना बाबद त्यांच्याकडून माहिती प्रथम घ्यावी असें मनांत वाटून मीं त्यांस अशी विनंति केली कीं, ह्याजबद्दल मेहेरबानी करून आपण मजला माहिती द्यावी. त्याजवरून त्यांनीं जें सांगितलें तें येणेंप्रमाणें—

जें हें जगत अनुभवास येतें तें सर्व धर्म समुदाय आहे. उदाहरण,

दगड ह्या पदार्थामध्यें रंग, वजन, परिमाण, विभाज्यत्व, कठीणपणा, इत्यादिधर्म आहेत. ह्या सर्व धर्मांचा समुदाय दगड आहे. हे सर्व धर्म काढून घेतले तर बाकी कांहीं राहील असें मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. प्रत्येक पदार्थांत जे धर्म असतात त्या धर्मांप्रमाणें त्या पदार्थाकडून व्यापार घडतात. उदाहरण, अग्नि हा दुसऱ्या पदार्थाला जाळतो. सजातीय धर्मांच्या पदार्थांकडून सजातीय व्यापार घडतात. उदाहरण, दोन तान्हीं मुलें घेतलीं असतां त्यांचें खाणें, पिणें, रडणें, हंसणें, इत्यादि व्यापार सजातीय असतात. ह्याप्रमाणें सर्व जड पदार्थ व चेतन पदार्थ ह्यांकडून आपआपल्या धर्मांप्रमाणें व्यापार घडतात. ह्यावरून सर्व पदार्थांची योग्यता सारखी आहे, म्हणजे, अमुक पदार्थ कनिष्ठ व अमुक श्रेष्ठ असा प्रकार मुळींच नाहीं.

लोक परमेश्वर आहे असें ह्मणून त्याचें अस्तित्व सिद्ध करण्याला जीं प्रमाणें आणितात तीं बरोबर नाहींत. लोक अशा प्रकारें विचार करितात कीं, ज्या पदार्थांकडून कांहीं विवक्षित कार्य नियमित प्रकारें घडतें त्या पदार्थाला कोणी कर्ता असला पाहिजे. जगामध्यें कांहीं कार्यें अमुक परिणाम घडावा असा हेतू सिद्धीस नेण्याजोगीं होतात. ह्याजवरून जगाचा कोणी तरी कर्त्ता असला पाहिजे. ह्याजविषयीं ते असें उदाहरण देतात कीं, जसें घड्याळांत अमुक वेळानें अमुक अंतरावर कांटे फिरतात व नियमित रीतीनें ठोके वाजतात, ह्मणून घड्याळास कोणी तरी घड्याळजी कर्त्ता आहे. आतां अशा प्रकारें अनुमान करणें हें चुकीचें आहे. कारण बरोबर रीतीनें कोणतेंही अनुमान करण्याला दोन वाक्यें लागतात, त्या दोन वाक्यांपासून तिसरें अनुमान वाक्य तयार होतें. ह्यास उदाहरण,

**१ प्रत्येक प्राणी अन्न खाणारा आहे.**

**२ वाघ हा प्राणी आहे.**

**३ म्हणून वाघ हा अन्न खाणारा आहे.**

ह्यावरून खरें अनुमान काढण्याला असा नियम आहे कीं, पदार्थाच्या कोणत्या एका वर्गाविषयीं अगर समुदाया विषयीं जें आहे अगर नाहीं असें आपण सांगतों तें त्या वर्गांतील अगर समुदायांतील कोणत्या

एका पदार्थाविषयीं आहे अगर नाहीं असें सांगतां येतें. वरील उदाहरणांत पहिल्या वाक्यांत " प्रत्येक प्राणी " ह्मणजे प्राण्यांचा वर्ग ह्मणजे समुदाय ह्याज विषयीं " अन्न खाणारा आहे " असें सांगितलें आहे, व दुसऱ्या वाक्यांत " वाघ " हा पदार्थ त्या वर्गांतला आहे असें सांगितलें, ह्यावरून वर सांगितल्या नियमाप्रमाणें असें अनुमान होतें कीं, " वाघ अन्न खाणारा आहे. " येथें पहिल्या व दुसऱ्या वाक्यांपैकीं कोणतें एक वाक्य खरें नसेल तर अनुमान करण्यांत चूक पडेल. उदाहरण,

१ प्रत्येक पशूला शिंगें आहेत.

२ घोडा पशु आहे.

३ म्हणून घोड्याला शिंगें आहेत.

येथें अनुमान चुकण्याचें कारण पहिलें वाक्य चुकीचें आहे. घोडा, हत्ती, इत्यादि पशु असून त्यांना शिंगें नाहींत. ह्मणून कांहीं पशूंना शिंगें असतात असें ह्मणण्याचें सोडून प्रत्येक पशूला शिंगें आहेत असें सामान्यतः ह्मणणें बरोबर नाहीं. तसेंच जर असें ह्मटलें कीं,

१. प्रत्येक प्राणी कांहीं तरी खातात.

२. दगडाच्या मूर्ती ठोके खातात.

३. ह्मणून दगडाच्या मूर्ती प्राणी आहेत.

येथें अनुमान चुकण्याचें कारण असें आहे कीं, पहिल्या वाक्यांत " खातात " ह्याचा जो अर्थ आहे तोच अर्थ दुसऱ्या वाक्यांत " खातात " ह्याचा नाहीं.

" जगाचा कर्त्ता आहे " असें वर सांगितल्याप्रमाणें अनुमान करण्याला पुढें लिहिलेलीं दोन वाक्यें खरीं आहेत असें प्रथम ठरलें पाहिजे.

१ ज्या ज्या पदार्थांकडून नियमित कार्य सिद्धीस जाण्याकरितां व्यापार घडतो त्या त्या पदार्थास कोणी कर्त्ता असतो.

## २. जगांतील पदार्थ नियमित कार्य सिद्धीस जाण्याचा व्यापार करितात.

येथें पहिलें वाक्य खरें होण्याकरितां, ज्या ज्या पदार्थांकडून नियमित कार्य सिद्धीस जाण्याचें कार्य घडतें त्यास करणारा आहे, असें ठरलें पाहिजे. ह्मणजे, उदाहरणार्थ, पाऊस नियमानें पडून धान्य उत्पन्न होतें, सूर्य नियमानें फिरून दिवस रात्र होतात, इ०, ह्या उदाहरणांत पावसाचा व सूर्याचा कोणी कर्त्ता आहे किंवा नाहीं हें माहीत नाहीं, ह्मणून जेथपर्यंत अशी माहिती नाहीं तेथपर्यंत पहिलें वाक्य खरें आहे असें ह्मणवणार नाहीं. ह्मणून अनुमान बरोबर आहे असेंही ह्मणवणार नाहीं.

कित्येक लोक असें ह्मणतात कीं, ब्राह्मणांचे वेद, मुसलमानांचें कुराण, ख्रिश्चन् लोकांचें बैबल्, इ० धर्मपुस्तकांत ईश्वर आहे असें सांगितलें आहे, ह्मणून ईश्वर आहे. तर येथें तें पुस्तक खरें आहे असें ठरल्याशिवाय त्याजवरून ईश्वर आहे असें सिद्ध होत नाहीं.

ब्राह्मण लोक असें म्हणतात कीं, वेद अनादि असून त्यांला कर्त्ता नाहीं. हें त्यांचें ह्मणणें खोटें आहे. कारण ही गोष्ट खरी असल्याबद्दल कांहीं स्वतंत्र प्रमाण नाहीं. ख्रिश्चन् इत्यादि कांहीं लोक असें ह्मणतात कीं, आपलीं धर्मपुस्तकें साक्षात् ईश्वरानें प्रसिद्ध केलीं आहेत. परंतु हें शाबीत करण्यास ते योग्य व स्वतंत्र पुरावा दाखवूं शकत नाहींत. तर हीं सर्व धर्मपुस्तकें कोणीं लबाड व धूर्त अशा मनुष्यानें कांहीं मतलब साधण्याकरितां केलीं आहेत. त्यांतील गोष्टींवर भरंवसा ठेवणें योग्य नाहीं. ज्याप्रमाणें मनुष्यांनीं केलेल्या ग्रंथांत दोष आढळतात, तसे दोष त्यांतही आहेत. ह्मणून सर्व धर्मपुस्तकांनां प्रमाणाच्या कामांत कांहींच किंमत देतां येत नाहीं. त्यांपासून फायदा तर कांहीं नाहींच, परंतु उलटें लोकांची भलती समजूत करून त्यांचा वेळ फुकट जाईल अशा कामाकडे त्यांना तीं धर्मपुस्तकें प्रवृत्त करितात.

कांहीं लोक असें ह्मणतात कीं, बहुतेक लोक ईश्वर आहे असें ह्मणतात, ह्याजवरून ईश्वर असला पाहिजे. तर हें ह्मणणें अगदींच अप्रयोजक आहे. कारण, थोड्या वर्षांपूर्वीं पृथ्वीवरील बहुतकरून सर्व लोक

पृथ्वी फिरत नसून सूर्य फिरतो असें ह्मणत होते, परंतु ज्योतिष शास्त्रावरून असें साफ ठरलें आहे कीं, ही समजूत चुकीची आहे. ह्याजवरून बहुतेक विद्वान् लोकांनीं अमुक गोष्ट आहे अगर नाहीं असें ह्मटल्यानेंच ती गोष्ट खरी आहे किंवा खोटी आहे असें ठरत नाहीं.

कोणी असें ह्मणतात कीं, जर ईश्वर असा एखादा पदार्थ नसता, तर ईश्वराविषयीं लोकांमध्यें जी कल्पना आहे ती मुळींच नसती, व ईश्वर हा शब्दही भाषेंत नसता, असें ह्मणणें पोकळ व पोरकट आहे, कारण जगांत पदार्थ नाहींत अशांचीं नांवें असलेले पुष्कळ शब्द आहेत. उदाहरण, खपुष्प, शशविषाण, वंध्यापुत्र, असे शब्द असून तसे पदार्थ नाहींत.

जगांत साधारणपणें असें आढळतें कीं, ज्यास मोठेपणा असतो किंवा ज्यास अलौकिक कीर्ति असते तो लोकांना लवकर जाणण्याजोगा असतो. ह्मणून जर जगाचा कर्त्ता असा मोठा पराक्रमी व शाहाणा ईश्वर असता, तर तो लोकांना अतिशय सुलभतेनें जाणण्या जोगा असता. जे लोक फार अविद्वान् किंवा मृत्यूला अगर दुसऱ्या दुःखाला भिणारे असतात त्यांना ईश्वराचें खरोखर ज्ञान नसलें तरी ईश्वर ह्मणून कोणी आहे व तो आपलें दुःख निवारण करितो असें ते समजून आपलें समाधान करितात. बहुतेक लोक आपलें दुःख निवारण व्हावें ह्मणून ईश्वराला नवस करितात. मग "कावळा बसावयास आणि डाहाळी मोडावयास गांठ पडली" ह्या म्हणीप्रमाणें जरी एखाद्या दुःखाचें निवारण झालें तरी तो व त्याच्यासंबंधाचे अडाणी लोक देव नवसास पावला असें समजतात. मग आणखी शेंकडों लोक त्याचा कित्ता घेतात. ह्याप्रमाणें ईश्वरसंबंधीं वेड पिकत जातें. आतां ज्यास नवसाच्या उलट होतें तो विचारशून्य असल्यामुळें तो पूर्वीं जसा ईश्वर आहे असें समजत होता तसा तो नाहीं असें नसमजतां नशीबाला दोष देतो.

पृथ्वीवरील अनेक लोकांमध्यें जे नामांकित बुद्धिमान् नैय्यायिक झाले व होतात ते बहुतकरून नास्तिक असतात असें आढळण्यांत येतें.

जर एकादें मूल उपजल्यापासून त्यास अशा प्रकारें ठेविलें कीं, त्याच्या कानीं कोणत्याही प्रकारें देव हा शब्द पडूं नये अगर देव ह्मणून कांहीं

पदार्थ त्याचे नजरेस आणूं नये व देवा संबंधी ह्मणून कांहीं व्यापार करूं नये, व त्याला जगासंबंधी इतर ज्ञान करून देऊन तो विचारवंत होईल अशा प्रकारें विद्या शिकविली तर त्याला त्याच्या जन्मामध्यें कधींही ईश्वर असल्याचें वाटणार नाहीं, व त्याला ईश्वराची जरूरही लागणार नाहीं.

जग असण्याला व चालण्याला परमेश्वर नाहीं असें मानलें असतां कोणतीही अडचण येण्याजोगी नाहीं. कारण हल्लीं जगामध्यें जे पदार्थ आढळतात ते जसें ईश्वर आहे अशी कल्पना करून ज्या स्थितींत आहेत तसें ईश्वर नाहीं असें समजून त्या स्थितींत आहेत असें ह्मणण्यास काय अडचण आहे?

जगाला कर्त्ता ईश्वर आहे असें मानिल्यास, ईश्वराला दुसरा कोणी कर्त्ता आहे असें कां मानूं नये? जर तसें न मानावें, तर ईश्वर किती आहेत ह्याचा अंत लागणार नाहीं, आणि जर तसें मानावयाचें नसेल, तर जगताला मुळींच ईश्वर नाहीं असें मानिलें असतां काय हरकत आहे?

प्राण्यांना कोणत्याही पदार्थाचें ज्ञान होण्याचीं साधनें त्यांचीं इंद्रियें आहेत. जर ईश्वर नाक, डोळे, इत्यादिक कोणत्याही इंद्रियांना गोचर होत नाहीं तर इंद्रियांना अगोचर असणारे पदार्थ जसे मुळींच नाहींत असें ह्मणतों तसा ईश्वर मुळींच नाहीं असें ह्मणणें योग्य दिसतें, व जर परमेश्वर खरोखर असता तर तो जगाप्रमाणें इंद्रियांना गोचर होण्याला काय अडचण आहे? जर कोणी ह्मणेल कीं, परमेश्वराचें ज्ञान होण्याची योग्यता असल्यास त्याचें ज्ञान होतें, तर हें ह्मणणें अगदीं ठकबाजीचें आहे; कारण कोणत्याही इंद्रियांनां कोणत्या एका पदार्थाचें ज्ञान प्राण्याला योग्यता असल्या शिवाय होत नाहीं अशाविषयीं परमेश्वराशिवाय दुसरें उदाहरणच नाहीं. मनुष्याची योग्यता कशीही असली तथापि डोळ्यांनीं पाहातां येण्याजोगा पदार्थ हरएक डोळस मनुष्याच्या डोळ्यांना दिसतो.

जर ईश्वर ह्मणून कोणी असून त्यानें जग केलेलें असेल, तर जगाच्या स्थितीवरून व व्यापारावरून ईश्वराला शाहणपणा फार कमी असावा असें होतें. एवढेंच नाहीं तर तो पराकाष्ठेचा मूर्ख असावा असें ठरतें. मनुष्यानें आपल्या स्थितीविषयीं विचार केला असतां आपल्या

जन्मापासून मरणापर्यंत किती दुःखें भोगावीं लागतात, व जगांतील दुसऱ्या ज्या पदार्थांशीं आपला संबंध पडतो ते किती वाईट व त्रासदायक आहेत ह्याचा विचार केला असतां अशा जगताला शाहणा कर्त्ता आहे असें मानणें ही मोठी शरमेची गोष्ट आहे. जर जगाचा कर्त्ता असा ईश्वर खरोखर असेल, आणि तो निर्भय व निर्भीडपणानें व निःपक्षपातानें आमच्यापुढें येईल, तर त्यालासुद्धां असें कबूल करणें भाग आहे कीं, जगांतील अति कनिष्ट प्राण्यास जितकें शहाणपण आहे तितकें पण शहाणपण आपणास नाहीं. असें त्यास वाटून पराकाष्ठेची त्याला लाज वाटेल. कारण जर कोणी एकादें जग असें तयार करील कीं, तेथें दुःख मुळींच नाहीं, तर अशा प्रकारें जग करणारा, हल्लींच्या जग करणाऱ्या ईश्वरापेक्षां अधिक शाहणा होईल किंवा नाहीं? ह्मणून जर ईश्वर असेल, तर तो सर्वज्ञ आहे असें मानणें बरोबर नसून **असर्वज्ञ** आहे असें ह्मणणें योग्य व वाजवी होईल.

जगांत हल्लीं जो ज्ञानाचा समुदाय मनुष्यास समजण्यासारखा आहे तो सर्व कोणा एका मनुष्याला समजणें अशक्य आहे, व मनुष्यांला असें समजतें कीं, हल्लीं जगांत जो ज्ञानाचा समुदाय मनुष्यांना माहीत झालेला आहे त्याहून ज्ञानाचा भांडार अतिशय मोठा व मनुष्याला थांग न लागण्याजोगा आहे, तर जसे कोणी वैय्याकरणीच असल्यास त्याला दुसऱ्यास ज्योतिष येतें किंवा नाहीं हें समजूं शकत नाहीं, तसें अल्पज्ञ मनुष्याला ईश्वर सर्वज्ञ आहे किंवा नाहीं हें ठरवितां येणें शक्य नाहीं.

ईश्वर **सर्वशक्तिमान्** आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण जगाच्या रचनेवरून पाहातां ईश्वर अल्प शक्तिमान् व फारच दुर्बल असला पाहिजे. वरील उदाहरणावरूनच असें उघड होतें कीं, ज्यापेक्षां जगांत दुःखें आहेत त्यापेक्षां सर्वशक्तिमान् मानलेल्या ईश्वरास दुःखरहित असें जग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं असें होतें. जर सामर्थ्य असून तसें जग उत्पन्न केलें नाहीं असें मानलें, तर ईश्वर पराकाष्ठेचा क्रूर व निर्दय आहे असें ह्मणणें भाग पडतें. अशा ईश्वराविषयीं विचार करणें अगदीं अयोग्य असून त्याच्या दुष्टपणाला शासन करण्यास कोणी नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

तसेंच, ईश्वर **अनंत** ह्मणजे अमर्याद आहे असें ह्मणतात. परंतु हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण अनंत ह्मणजे ज्यास अंत नाहीं तें असा अर्थ केला असतां ज्यास अंत ह्मणजे मर्यादा नाहीं अशा पदार्थाची कल्पना मनुष्यासारख्या मर्यादित प्राण्याला कधींच येऊं शकणार नाहीं. अनंत ह्मणजे ज्याचा अंत ह्मणजे मर्यादा माहीत नाहीं असा अर्थ केला असतां असें होतें कीं, ईश्वराला मर्यादा आहे परंतु ती आपल्यास माहीत नाहीं. ह्याशिवाय ईश्वर अनंत आहे ह्याचा अर्थ असा होऊं शकेल कीं ईश्वराला मर्यादा आहे किंवा नाहीं हें समजण्याजोगें नाहीं. असें ह्मटलें तरी फलितार्थ एकच होतो.

तसेंच, ईश्वर **सर्व व्यापी** आहे असें ह्मणतात. हेंही म्हणणें बरोबर नाहीं. कारण सर्वव्यापी म्हणजे सर्व जागा व्यापून असणें. जो कोणी कांहीं पदार्थ उत्पन्न करितो तो त्या सर्व पदार्थाला व्यापून कसा असतो अशाविषयीं उदाहरण आढळत नसून त्याची कल्पना मनुष्याच्या मनांत येणें अशक्य आहे. आणखी ईश्वर सर्वव्यापी म्हणण्याला '**सर्व**' म्हणजे काय हें प्रथम समजलें पाहिजे. सर्व पदार्थ समजण्याची मनुष्याला शक्ति नाहीं हें सर्व प्रकारचे विद्वान् कबूल करितात. तर जेथ पर्यंत "सर्व" म्हणजे काय ह्याचें ज्ञान नाहीं तेथपर्यंत "सर्वव्यापी" ह्या शब्दाचा अर्थ समजूं शकणार नाहीं.

तसेंच, ईश्वर **स्वतंत्र** आहे असें म्हणतात. तेंही म्हणणें बरोबर नाहीं. कारण ईश्वरानें पदार्थाचे धर्मांत कांहीं बदल केल्याचें उदाहरण आपल्या अनुभवास येत नाहीं. निरनिराळ्या लोकांच्या धर्मपुस्तकांत ईश्वरी कृत्यें लिहिल्याचें आढळतें. परंतु हीं धर्मपुस्तकें खरीं असल्याचें शाबीत करण्याला पुरावा नसून सृष्टिक्रमाविरुद्ध ज्या गोष्टी त्यांत आहेत त्यांजवर भरंवसा ठेवण्याला योग्य कारण नाहीं. तीं धर्मपुस्तकें कोण्या धूर्त व कार्यसाधु तथापि थोडा शिकलेला अशा मनुष्यानें आडाणी लोकांकडून आपला व आपल्या इष्ट मित्रांचा फायदा करून घेण्यासाठीं बनविलेलीं आहेत. कोणी लोक असें ह्मणतातकीं, आमचें धर्मपुस्तक होऊन तीन हजार वर्षें झालीं, दुसरे असें म्हणतात कीं, आपलें धर्मपुस्तक होऊन दहा हजार वर्षें झालीं, तिसरे कोणी असें म्हणतात कीं, आपलें

धर्मपुस्तक अनादि आहे. हीं त्यांचीं सर्व म्हणणीं त्यांच्या त्यांच्या ग्रंथांत लिहिलेल्या गोष्टींवरूनच खोटीं ठरतात. एवढेंच नाहीं. परंतु ज्योतिषशास्त्र, भूगर्भशास्त्र, इत्यादि शास्त्रांतील अर्वाचीन काळच्या माहितीवरून त्यांचा खोटेपणा सिद्ध होतो.

आतां बहुतेक लोक असें म्हणतात कीं, **आत्मा** म्हणून एक मनुष्यामध्यें पदार्थ आहे. तो त्याच्या शरीराहून भिन्न असून शरीराचा नाश झाल्यावरही आत्मा कायम असतो. हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. जसें घड्याळ अनेक चक्रें वगैरे ह्यांच्या संयोगाचा परिणाम असून त्यांत तीं चक्रें वगैरे ह्यांहून निराळा पदार्थ नाहीं, तसें प्राण्यांमध्यें हाडें,मांस,कातडें, रक्त,इत्यादि जे शरीरांत पदार्थ आहेत त्यांहून निराळा असा आत्मा म्हणून पदार्थ नाहीं.रसायनशास्त्रावरून असें समजतें कीं,जेव्हां दिवा जळत असतो तेव्हां उष्णतेच्या योगानें तेलाची वाफ व प्राणवायु ह्यांचें मिश्रण होत असतें.जेथपर्यंत सदर्हूप्रमाणें मिश्रण होण्याचा व्यापार चालू असतो,तेथपर्यंत दिवा जळत असतो. तेलाची वाफ कमी पडली किंवा प्राणवायूचा पुरवठा कमी झाला अगर मिश्रण होण्याला जितकी ऊष्णता पाहिजे तिजपेक्षां कमी झाली, तर जळण्याचा व्यापार कमी होऊं लागून शेवटीं बंद होतो. तसें मनुष्याचें जगणें हें एक प्रकारचा जळण्याचा व्यापार आहे. जेथपर्यंत ह्या जळण्याची क्रिया चालण्याला योग्य व जरूर असलेली सामग्री असते, तेथपर्यंत मनुष्य जगतो, ह्या सामग्रींत कमीपणा झाला ह्मणजे मनुष्याच्या जगण्याचा व्यापार बंद होतो. जर एकादा दिवा लावून ठेवून त्याजवर कांचेची हंडी उपडी ठेविली, तर दिव्याची जी स्थिति होते व तो जाईपर्यंत जसा व्यापार घडतो, तशी मरणाऱ्या मनुष्याची स्थिति झाल्याचें व त्यापासून व्यापार घडल्याचें दृष्टीस पडतें.

मनुष्य हा कित्येक प्रकारच्या कित्येक परमाणूंचा समुदाय आहे. त्या समुदायाचे जे धर्म आहेत तेच मनुष्याचे धर्म आहेत. मनुष्य मेला ह्मणजे त्याच्या परमाणूंच्या समुदायाच्या रचनेंत फेरफार होतो. पुनः त्याच परमाणूंची अगर त्यांपैकीं कांहीं व दुसरे कांहीं असे मिळून योग्य

प्रकारें जुळणी झाली ह्मणजे त्याचा प्राणी बनतो. उदाहरण, चक्रप्राणी[१] मेल्यावर त्याची पूड करून पाण्यांत टाकिली असतां त्याच्या परमाणूंची जुळणी अशी होते कीं, तिजपासून जीवंत प्राण्याचे व्यापार दृष्टीस पडूं लागतात.

जर कोणी असें म्हणेल कीं, सुखदुःख ह्यांचा अनुभव घेणारा असा जो कोणी शरीरांत आहे तो आत्मा आहे, तर असें म्हणणें बरोबर नाहीं. कारण परमाणूंची जुळणी होऊन जो प्राण्याचा देह बनतो त्याचाच धर्म सुखदुःखाचा अनुभव मिळणें हा आहे. मनुष्याला जेव्हां पक्षघात वायु होतो तेव्हां त्याला सुखदुःखाचा अनुभव पूर्वींप्रमाणें येत नाहीं. असें एक उदाहरण पाहाण्यांत आलें आहे कीं, एका मनुष्याला त्याच्या गालाचा एका पैशाएवढा भाग सोडून बाकी सर्वांगास पक्षवायु झाला होता, तेव्हां त्यास खाण्यापिण्यास देण्यास्तव त्याला कांहीं समजाविणें झालें तर त्याच्या गालावर खुणा करून कळवीत असत, बाकी सर्व अंगावरील ज्ञानशक्ति अगदीं नाहींशी झाली होती.[२]

मनुष्याची प्रकृति कोणत्याही प्रकारें बिघडल्यास त्यास औषधें देऊन नीट करितां येतें. वैद्य मातीसारखी एखादी पुडी खावयास देतो, तेणेंकरून सर्व देहाला सुख होतें. तसेंच मनुष्याला सोमलाची पुडी खायाला दिली तर त्या पुडीनें त्याच्या शरीराला दुःख होतें. ह्याजवरून जड पदार्थापासून सुखदुःख उत्पन्न होतें. सुखदुःखाचा अनुभव घेणारा असा कोणी देहाहून निराळा नाहीं. कोणती एक गोष्ट मध्यें खंड न पडतां अगर खंड पडल्याचें दृष्टोत्पत्तीस येण्यासारखें नसतां एकसारखा कांहीं व्यापार घडत गेला असतां आरंभापासून शेवटपर्यंत सर्व व्यापार एकच आहे अशी मनुष्याला भ्रांति होते. उदाहरण, दिवा जळतो तेव्हां प्रत्येक क्षणीं तेलाची वाफ निरनिराळी उत्पन्न होत असून ती हवेंतील प्राणवायूच्या निरनिराळ्या भागांशीं मिसळत जाते, तथापि दिवा पाहणाराला असें वाटतें कीं, आरंभापासून शेवटपर्यंत दिव्याची जोत एकच आहे.

---

१ प्रश्नोपनिषदाचें पृष्ठ ४४ ह्याजवर ह्या प्राण्याचें वर्णन दिलें आहे.

२ त्यानर्स प्र्याक्टिस आव मेडिसिन, १८६९ भाग १ पृष्ठ ४३२.

ह्याप्रमाणें शरीरामध्यें जळण्याचा व्यापार एकसारखा चालत असल्यामुळें शरीरामध्यें पहिल्यापासून शेवटपर्यंत एक जीव आहे अशी भ्रांति होते. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, जे लोक असें ह्मणतात कीं, 'जीव जें कृत्य करितो त्याजविषयीं तो जबाबदार असतो' हें बरोबर नसून गैरवाजवी आहे, कारण निरनिराळया क्षणांत निरनिराळे जीव होत असल्यामुळें एका जीवाच्या कृत्याबद्दल दुसरा जीव जबाबदार होतो.

आजपर्यंत शास्त्रीय प्रकरणीं निरनिराळ्या प्रकारचे चमत्कारिक शोध लागून यांत्रिकशक्ति, उष्णता, प्रकाश, विद्युल्लता, लोहचुंबकशक्ति ह्यांचें स्वरूप व व्यापार ह्यांजविषयीं माहिती मिळण्यांत आली आहे, तसें शरीराहून जीव म्हणून कांहीं निराळा पदार्थ असता, तर अनेक विद्वान् लोकांनीं आजपर्यंत कोट्यावधि मृत्यूचीं उदाहरणें पाहिलीं असून मरणसमयीं शरीरांतून जीव निघून जातो अशाविषयीं ते बिलकूल अनुभव दाखवीत नाहींत. मनुष्य मरावयास लागतो तेव्हां त्याचें रक्त फिरण्याचें हातापायांच्या टोंकांकडून बंद होत जाऊन शेवटीं रक्ताशयांत रक्ताचा व्यापार अगदीं बंद पडून रक्ताची उष्णता जाईतोंपर्यंत त्याची छाती ऊन लागते. ही उष्णता हवेंत निघून गेली ह्मणजे मनुष्य गार पडतो. मग त्याला पुरतात अगर जाळतात. ह्यावरून मनुष्य मरतांना उष्णता जाण्याचे व्यापाराशिवाय दुसरें कांहीं घडल्याचें आढळत नाहीं. ह्मणून उष्णतेशिवाय जीव असा पदार्थ शरीरांत असल्याचें मुळींच कोणत्याही प्रकारें आढळत नाहीं. जेव्हां आपण ढेंकूण चेंगरतों, किंवा माशी अथवा डांस पटदिशीं मारतों, तेव्हां जें घडतें त्यावरून जीव ह्मणून कांहीं शरीराहून निराळा आहे असें मानणें अनुभवाविरुद्ध आहे; आणखी जर मांजरानें जीवंत उंदीर गिळिला, तर जरी उंदीर मांजराच्या पोटांत मेला तरी उंदराचा जीव मांजराच्या शरीरांत कां राहूं नये व मांजराच्या शरीराच्या व्यापारानें त्याला सुखदुःख कां वाटूं नये? मांजराच्या पोटांत उंदीर जाऊन तेथें मेला असतां उंदराच्या जीवाचें काय होतें व तो जीव बाहेर पडत असल्यास मांजराच्या शरीरांतून कसा बाहेर पडतो हें कोणी सांगूं शकेल काय!

आणखी आपण कोणी प्राणी आहोंत असें जें वाटतें हें खोटें आहे

असें कां ह्मणूं नये ? एवढेंच नाहीं. तर आपल्याशिवाय जग आहे असें जें वाटतें तेंही खोटें आहे असें कां ह्मणूं नये ? कारण आपल्या इंद्रियांच्या द्वारानें जें ज्ञान मिळतें तें खरें मानण्याला प्रमाण नाहीं, उलटें तें खोटें आहे असें मानणें योग्य होईल. डोळ्याच्या पांपणीला बोटानें दाबून धरून दिव्याच्या जोतीकडे पाहिलें असतां प्रकाशाच्या तारा तारा निघाल्याशा दिसतात व कोणत्याही एका पदार्थाकडे पाहिलें असतां त्याचे दोन दोन पदार्थ दिसतात. तर बोटानें डोळ्याची पांपणी दाबली असतां जशी डोळ्याची रचना होते तशी कोणा मनुष्याचे डोळ्याची रचना जन्मापासून असल्यास त्याला दोन दोन पदार्थ दिसल्यास त्यानें आपणास जो अनुभव येतो तो खरा ह्मणावा किंवा दुसऱ्यास दिसतें तें खरें ह्मणावें ? जर तो आपल्याच अनुभवाप्रमाणें चालेल तर प्रत्येक पदार्थाचे दोन दोन पदार्थ आहेत अशा समजुतीनें त्यानें केलेल्या व्यापारांत व इतर मनुष्यांनीं तो पदार्थ एकच आहे असें समजून केलेल्या व्यापारांत फरक पडत नाहीं, तथापि दोघांच्या ज्ञानांपैकीं खरें कोणाचें व खोटें कोणाचें हें ठरवितां येणार नाहीं. पुष्कळ मनुष्यांस ज्या प्रकारचें ज्ञान होतें त्या प्रकारचें ज्ञान खरें असतें असें ह्मणणें वाजवी नाहीं. ह्याविषयी उदाहरण देऊन वर सांगितलेंच आहे. दर्शनशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, एकाच रंगाविषयीं निरनिराळ्या मनुष्यांनां निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान होतें. ह्याप्रमाणें जर इंद्रियांनीं होणारें ज्ञान फसविणारें आहे, व इंद्रियांवर भरंवसा ठेवतां येत नाहीं, तर इल्लींच्या ज्ञानावरून जग आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं. ह्याशिवाय जेव्हां मनुष्य झोंपीं जाऊं लागतो अगर मरूं लागतो, तेव्हां जग हलकें हलकें नाहींसें होत जाऊन अखेरीस अगदीं नाहींसें होतें, तेव्हां विशेषेंकरून मेलेल्या मनुष्यानें जग आहे असें ह्मणावें किंवा नाहीं असें ह्मणावें ? साधारणपणें स्वप्न थोडे वेळ असतें व स्वप्नांतून जागें झाल्यावर स्वप्नांतील पदार्थ खोटे आहेत असें लोक ह्मणतात, तर जागृत अवस्था फार वेळ असते ऐवढ्याच कारणानें जागृत अवस्थेंतील ज्ञानावरून जग आहे असें अनुमान करणें वाजवी होणार नाहीं. जर कोणी मनुष्य जन्मास येऊन एक घटकाभर जग पाहून मेला आणि तो मेल्यावर त्याचा आत्मा असतो असें मानिलें, तर स्वप्नांतून

उठलेल्या मनुष्यास जसे ते स्वप्नांतील पदार्थ खोटे वाटतात तसे ह्या मेलेल्या मनुष्यास त्यानें एक घटकाभर पाहिलेले जग खोटें वाटेल किंवा नाहीं? ह्याजवरून आपण आहोंत असें जें आपणास वाटतें हें ज्ञान खरें आहे असें ह्मणण्याला कांहीं प्रमाण नाहीं.

ह्याप्रमाणें स्वप्न संपल्यावर मोठा आवाज ऐकूं येऊन मी दचकून जागा झालों, आणि पाहतों तों मोठें आभाळ येऊन गारांचा पाऊस सडकून पडत आहे, व पाऊस व वारा ह्यांची धूमसचक्री चालली आहे, आणि माझे जवळच शास्त्रीबावा पोथी वाचीत बसले आहेत, असें पाहिलें. त्यांना विचारिलें कीं, तुह्मास कांहीं मोठा आवाज ऐकूं आला काय? तेव्हां ते ह्मणाले कीं आपल्या समोर एक मोठी वीज चमकून मोठा गडगडाट झाला, वीज कडकडून समोर पडली,व त्यांत निरनिराळ्या जातींचे कांहीं विद्वान् लोक भाजून मेले. नंतर मीं आपले स्वप्नांतील गोष्टी शास्त्रीबावांस सांगून त्यांच्याशीं वादविवाद केला तेव्हां मी ज्या शंका काढल्या त्यांचें समाधान त्यांच्यानें करवेना. पुढें आणखी मी स्वस्थपणानें, निरभिमानानें, निःपक्षपातानें, व सूक्ष्म रीतीनें, व खरें शोधून काढण्याच्या बुद्धीनें, विचार करून पाहातां असें लक्ष्यांत आलें कीं—

१. मनुष्याला खरें ज्ञान होण्याला प्रत्यक्ष प्रमाणावांचून दुसरें साधन नाहीं. अज्ञानी लोक अनुमान हें एक प्रमाण आहे असें मानतात. परंतु अनुमानानें नेहमीं खरें ज्ञान होईल असें नसून नुसत्या अनुमानानें झालेलें अज्ञान खरें आहे किंवा खोटें आहे हें हमेशा समजूं शकत नाहीं. व्यवहारांत नेक गोष्टींचे संबधानें आपलीं अनुमानें किती चुकतात हें आपणास घटकों घटकीं अनुभवास येतें. एवढेंच नाहीं, तर विद्वान् ह्मणविणाऱ्या लोकांचीं मतें एकाच गोष्टी विषयीं एकाच वेळीं किती भिन्न असतात, व एककालच्या अशा लोकाचें मत दुसऱ्या कालच्या तशाच लोकांच्या मता पासून भिन्न असतें, व विद्वान् ह्मणविणारा अशा एकाच मनुष्याचें मत निरनिराळ्या वेळीं कसें बदलतें हें त्यांच्या ग्रंथावरून व त्यांच्या ग्रंथांच्या निरनिराळ्या आवृत्तीवरून उघड दिसतें, आणि त्यांच्या त्यांच्या अनुमानांत कशा चुका होतात तें समजतें. जगांत अनंत गोष्टींविषयीं जे अनेक वाद आहेत त्यांचें मूळ बीज अनुमानप्रमाण आहे.ह्मणून

खरें ज्ञान मिळविण्याची इच्छा करणारानें अनुमानप्रमाण अगदीं घेऊं नये.

२. देव मुळींच नाहीं. जगाला कोणी कर्त्ता असल्याचें प्रत्यक्ष होत नसून तसा कर्त्ता असण्याचें कांहीं कारण नाहीं. जर जगाला कर्त्ता मानावयाचा तर त्या कर्त्याला कर्त्ता आहे असें कां मानूं नये? जर अनवस्था दोष येतो, ह्मणून कर्त्याला कर्त्ता मानावयाचा नसेल, तर पहिलाच कर्त्ता मानण्याविषयीं कोणी मानेवर गोणी ठेविली आहे? प्रत्यक्ष अनुभवास येणारें जग हें धर्मसमुदाय आहे. निरनिराळ्या पदार्थांत निरनिराळे धर्म आहेत. प्रत्येक पदार्थ आपआपल्या धर्माप्रमाणें व्यापार करितो. त्या धर्मांत किंवा त्यांच्या व्यापारांत फेरबदल करण्याला प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या मनुष्यामध्यें अगर दुसऱ्या कोणत्याही प्राण्यामध्यें सामर्थ्य नाहीं, मग अप्रत्यक्ष व कल्पित असा जो पदार्थ ईश्वर त्यामध्यें कोठून असणार ?

३. देव मुळींच नाहीं, ह्मणून ज्या धर्मपुस्तकांत देव आहे असें सांगितलें असेल तीं सर्व धर्मपुस्तकें खोटीं आहेत. कित्येक अज्ञानी लोक धर्मपुस्तकें हें निराळें प्रमाण मानितात. परंतु धर्मपुस्तक खरें ठरल्याशिवाय त्याचें प्रमाण कांहीं उपयोगाचें नाहीं. धर्मपुस्तकें हीं बावळ्या, भोळ्या, व भित्र्या मनुष्यांकरितां आहेत. ज्यास खरें ज्ञान पाहिजे असेल त्यानें वेदांतशास्त्राचा कधींही अभ्यास करूं नये. वेदांतशास्त्राचे अभ्यासानें मनुष्य हा एक दगड बनतो, व पुढील जग नसल्यामुळें त्यास पुढील जगाचें सुख मिळत नाहींच, परंतु ह्या जगांत जे सुख मिळण्यासारखें असेल त्यास मात्र तो मुकतो. ह्याप्रमाणें आपल्या हिंदुस्थानांत शंकराच्यार्य, मध्वाच्यार्य, वल्लभाच्यार्य, रामानुजाच्यार्य, इत्यादिकांनीं अद्वैत, द्वैत, शुद्ध अद्वैत, विशिष्ट अद्वैत, इत्यादि अनेक पाखांड मतें काढून अल्प बुद्धीचे व भोळे व बावळे व नादिष्ट अशा लोकांना विनाकारण घोंटाळ्यांत घातलें आहे. ज्यास देशाचें खरोखर कल्याण करण्याची इच्छा असेल त्यानें जगांतील देवाची कल्पना जेणेंकरून नाहींशी होईल व जगांतील खऱ्या सुखाची माहिती होईल तसें करण्याविषयीं मोठ्या तत्परतेनें झटावें.

४. देहामध्यें देहाहून निराळा असा आत्मा मुळींच नाहीं. ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास येते. ह्मणून देहाचा नाश झाल्यावर आत्मा असा

पुणे मराठी ग्रंथालय ... नारायण ... ६६७८



कांहीं पदार्थ बाकी राहात नाहीं. पुनः जन्म व पुनः मरण नाहीं. देह व आत्मा हे दोन्ही नसल्यामुळें स्वर्ग व नरक असे मुळींच पदार्थ नाहींत. तसेच धर्म व अधर्म, नीति व अनीति, दृष्ट व अदृष्ट, पुण्य व पाप, शुभ व अशुभ, सोंवळें व ओंवळें, भक्ष्य व अभक्ष्य, श्राद्ध व पक्ष, शौचाशौच, अब्रू व बेअब्रू इत्यादि हे सर्व कल्पित व खोटे आहेत. देहाचे हातपाय इत्यादि अवयव छेदून अथवा शरीर फाडून पाहिलें असतां असें अनुभवास येतें कीं, डोक्यामध्यें मेंदू आहे; व मी असें वाटणें, सुखदुःखाचा अनुभव घेणें, विचार करणें, इ० हे त्या मेंदूचे धर्म आहेत. मेंदु योग्य स्थितींत असून त्यास योग्य प्रकारें रक्त पोंचतें तेथपर्यंत मी हा कायम असतो. मेंदूस विशेष प्रकारची इजा किंवा त्याची अव्यवस्था झाली, व त्यास रक्त पोंचेनासें झालें ह्मणजे मीपणाचें ज्ञान नाहींसें होतें. हेंच मरण आहे. ह्मणून वेदांतशास्त्रवेत्ते जसें समजतात तशा प्रकारचा ज्यापेक्षां आत्मा असा पदार्थ नाहीं त्यापेक्षां भूत, हाडळ, चेटुक, मंत्र, ज्यादू, इ० सर्व खोटे आहेत. त्यांचा उद्देश अज्ञानी मनुष्यांनां भिवडावून लबाड लोकांना पोट भरतां यावें एवढाच आहे.

९. विशेष प्रकारें बनलेला देह हाच मी आहें. देहाला जें सुख तेंच मला सुख. देह नाहींसा झाला ह्मणजे मी नाहींसा झालों. देह ज्या प्रकारें बनलेला आहे त्यांत कांहीं विशेष प्रकारची बदलणूक झाली ह्मणजे मी नाहींसा होतों. देह असे तों पर्यंत तो आपल्या धर्माप्रमाणें वागतो. मी ( ह्मणजे देह ) ह्याच्या अंगीं जगांतील सुख घेण्याचें सामर्थ्य आहे. ह्मणून जेथपर्यंत देह असेल तेथपर्यंत देहाला दुःख न होतां जितकें सुख मिळेल, किंवा दुःख झाल्याशिवाय सुख मिळण्या जोगें नसेल तर दुःख फार कमी होऊन सुख फार पुष्कळ होईल, किंवा पुष्कळ दुःख होऊन थोडें सुख होण्याजोगें असल्यास व तितकें दुःख पतकरून सुख पाहिजे असल्यास तसें करून सुख मिळवावें. सारांश, ह्या जगांत, कोणत्याही प्रकारें सुख प्राप्त होईल तसें करणें हाच वागणुकीचा मुख्य नियम समजावा, हीच मुख्य नीति समजावी व हाच मुख्य धर्म समजावा. अशा प्रकारें ह्या जगांत अतिशय सुख मिळवून माझा ह्मणजे देहाचा नाश होणें ही मुक्ति आहे.

पुणे ...
४३७ व ...
बा. नों. ६६७४

# सर्व्वदर्शनसंग्रहः

नित्यज्ञानाश्रयं वन्दे निःश्रेयसनिधिं शिवम्।
येनैव जातं मह्यादि तेनैवेदं सकर्तृकम् ॥ १ ॥
पारं गतं सकलदर्शनसागराणा-
मात्मोचितार्थचरितार्थित सर्व्वलोकम्[1]।
श्रीशार्ङ्गपाणितनयं निखिलागमज्ञं
सर्व्वज्ञविष्णुगुरुमन्वहमाश्रयेऽहम् ॥ २ ॥
श्रीमत्सायणदुग्धाब्धिकौस्तुभेन महौजसा ।
क्रियते माधवार्य्येण सर्व्वदर्शनसङ्ग्रहः ॥ ३ ॥
पूर्व्वेषामतिदुस्तराणि सुतरामालोड्य शास्त्राण्यसौ
श्रीमत्सायणमाधवः प्रभुरुपन्यास्थत्सतां प्रीतये।
दूरोत्सारितमत्सरेण मनसा शृण्वतु तत् सज्जना
माल्यं कस्य विचित्रपुष्परचितं प्रीत्यै न सञ्जायते ॥ ४ ॥

अर्थ.—ज्यामध्यें निरंतर ज्ञान आहे व जो मोक्षरूप ठेवा आहे अशा शिवाला मी नमस्कार करितों; ज्यानें पृथ्वी इत्यादिकांस उत्पन्न केलें तोच त्यांचा कर्ता आहे ॥ १ ॥ जो सर्वमतरूप समुद्रांतून पार गेला आहे ( ह्मणजे ज्यास सर्व मतें माहीत आहेत ), ज्यानें आत्मशब्दाच्या योग्य अर्थानें सर्व लोकांना तृप्त केलें आहे, जो सर्व आगम जाणतो, जो शार्ङ्गपाणीचा पुत्र आहे, अशा सर्वज्ञ विष्णु गुरूच्या आश्रयानें मी नेहेमीं राहतों ॥ २ ॥ नामांकित सायनरूप क्षीरसमुद्रांतून निघालेल्या कौस्तुभमण्याप्रमाणें असलेला, व मोठा प्रतापवान्, अशा माधवाचार्यानें सर्वदर्शनसंग्रहनामक ग्रंथ केला आहे ॥ ३ ॥ पूर्वींच्या विद्वानांनाही समजण्यास फार कठिण अशा

---

१ आत्मोचिताचरितमार्थितसर्वलोकमितिपाठान्तरम् ॥

शास्त्रांचा उत्तमप्रकारें शोध करून नामांकित सायनवंशांतील समर्थ माधवाचार्यांनें सज्जनांच्या संतोषाकरितां तीं मतें स्पष्ट करून दाखविलीं आहेत. सज्जनलोकांनीं मत्सररहित मनानें तें ऐकावें. तऱ्हेतऱ्हेच्या फुलांनीं गुंफलेली माळ पाहून कोणाला आनंद होणार नाहीं? तर सर्वांना आनंद होईल ॥ ४ ॥

## भाग १.

### चार्वाकदर्शन.

अथ कथं परमेश्वरस्य निःश्रेयसप्रदत्वमभिधीयते बृहस्पतिमतानुसारिणा नास्तिकशिरोमणिना चार्व्वाकेण दूरोत्सारितत्वात् । दुरुच्छेदं हि चार्व्वाकस्य चेष्टितम् । प्रायेग सर्व्वप्राणिनस्तावत्

यावज्जीवं सुखं जीवेन्नास्ति मृत्योरगोचरः ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुत इति ॥

लोकगाथामनुरुन्धाना नीतिकामशास्त्रानुसारेणार्थकामावेव पुरुषार्थौ मन्यमानाः पारलौकिकमर्थमपन्हुवानाश्चार्वाकमतमनुवर्त्तमाना एवानुभूयन्ते । अत एव तस्य चार्व्वाकमतस्य लोकायतमित्यन्वर्थमपरं नामधेयम् ॥

**अर्थ.**—परमेश्वर अत्यंत सुखरूप मोक्ष देतो असें कसें ह्मणावें? कारण, बृहस्पतीच्या मताचा स्वीकार करणारा व सर्व नास्तिकांमध्यें मुख्य अशा चार्वाकानें[1] ह्या मताचें अगदीं खंडन केलें आहे. चार्वा-

---

१ युधिष्ठिरशकांत सहा नास्तिक होऊन गेले. त्यांमध्यें चार्वाक् हा मुख्य नास्तिक असल्यामुळें त्यास नास्तिकशिरोमणी असें सायणमाधवाचार्यांनें ह्या ग्रंथांत ह्मटलें आहे.जैन लोकांच्या ग्रंथावरून असें समजतें कीं, अवंती देशांत क्षिप्रा व चामला ह्या दोन नद्यांचे संगमाच्या ठिकाणीं शंखोद्धारनांवाचें क्षेत्र आहे. तेथें युधिष्ठिर शकाच्या ६६१ व्या वर्षीं वैशाख शुद्ध पौर्णिमेस चार्वाकाचा जन्म झाला. त्याच्या बापाचें नांव इंदुकांत व आईचें नांव सृग्विणी होतें. तो युधिष्ठिरशकाच्या ७२७ वे वर्षीं पुष्कर तीर्थीं यज्ञागिरी येथें मरण पावला. ह्यावरून तो ४३२० वर्षांपूर्वी होता असें होतें.

काच्या विचाराचें खंडन करणें फार कठिण आहे, कारण बहुतकरून सर्व लोकांचें पालुपद असें आहे कीं,

जीवंत असेतोंपर्यंत सुखानें राहावें;
मृत्यूच्या सपाट्यांत कोणी नाहीं असें नाहीं;
देह जळून त्याची एकदां राख झाल्यावर
तो पुनः कोठून जन्मास येणार?

ह्या नियमाकडे सर्व लोक लक्ष देऊन आणि नीतिशास्त्र व कामशास्त्र ह्यांस अनुसरून अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ आहेत, आणि परलोकसंबंधीं कांहीं नाहीं, असें मानतात, आणि चार्वाक मताप्रमाणें चालतात. ह्मणून चार्वाकाचे मताला **लोकायत** ( ह्मणजे लोकांमध्यें पसरलेलें ) असें दुसरें योग्य नांव आहे.

**तत्र पृथिव्यादीनि भूतानि चत्वारि तत्वानि। तेभ्य एव देहाकारपरिणतेभ्यः किण्वादिभ्यो मदशक्तिवत् चैतन्यमुपजायते तेषु विनष्टेषु सत्सु स्वयं विनश्यति ।**

**अर्थ.**—चार्वाकाच्या मतानें पृथ्वी, आप, तेज व वायु हीं जीं चार भूतें आहेत तीं चार तत्वें आहेत. त्यांचा जो देहाकार परिणाम होतो त्यापासून चैतन्य उत्पन्न होतें. ह्यास उदाहरण, साखर इत्यादिकांची दारू करण्याला कांहीं औषध किंवा बी ह्याचा उपयोग करितात, त्यांच्या संयोगापासून जसा कैफ उत्पन्न होतो तसें चैतन्य उत्पन्न होतें. देहाकार परिणामाचा नाश झाला असतां चैतन्यही नाहींसें होतें.

**तदिह विज्ञानघन एवैतेभ्यो भूतेभ्यः समुत्थाय तान्येवानुविनश्यति न प्रेत्य संज्ञास्तीति[१] ।**

**अर्थ.**—ह्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, ह्या पृथ्वी इत्यादि भूतांपासून भरीव ज्ञान ( ह्मणजे चैतन्य ) उत्पन्न होऊन त्यांचा नाश झाला ह्मणजे त्याचा नाश होतो, मेल्यानंतर ज्ञान राहात नाहीं.

---

[१] बृहदारण्यके अ० २ ऋ० ४।१२.

तत् चैतन्यविशिष्टदेह एवात्मा देहातिरिक्त आत्मनि प्रमाणाभावात् प्रत्यक्षैकप्रमाणवादितया अनुमानादेरनङ्गीकारेण प्रामाण्याभावात् ।

अर्थ.—ह्मणून चैतन्ययुक्त जो देह तोच आत्मा आहे. देहाहून निराळा असा आत्मा असल्याविषयीं प्रमाण नाहीं. कारण चार्वाकाच्या मतानें ज्ञानाला प्रत्यक्ष हें एकच प्रमाण आहे, आणि ते अनुमान इत्यादिकांस प्रमाण मानित नाहींत.

अङ्गनालिङ्गनादिजन्यंसुखमेवपुरुषार्थः । न चास्य दुःखसंभिन्नतया पुरुषार्थत्वमेव नास्तीति मन्तव्यम् अवर्जनीयतयाप्राप्तस्य दुःखस्य परिहारेण सुखमात्रस्यैव भोक्तव्यत्वात् । तद्यथा मत्स्यार्थी सशल्कान् सकण्टकान् मत्स्यानुपादत्ते । स यावदादेयं तावदादाय निवर्तते । यथा वा धान्यार्थी सपलालानि धान्यान्याहरति । स यावदादेयं तावदादाय निवर्त्तते । तस्माद्दुःखभयान्नानुकूलवेदनीयं सुखं त्यक्तुमुचितम् । न हि मृगाः सन्तीति शालयो नोप्यन्ते । न हि भिक्षुकाः सन्तीति स्थाल्यो नाधिश्रीयन्ते । यदि कश्चिद्भीरुर्दृष्टं सुखं त्यजेत् तर्हि स पशुवन्मूर्खो भवेत् । तदुक्तम्

त्याज्यं सुखं विषयसङ्गमजन्म पुंसां
दुःखोपसृष्टमिति मूर्खविचारणैषा ।
व्रीहीन् जिहासति सितोत्तमतण्डुलाढ्यान्
को नाम भोस्तुषकणोपहितान् हितार्थी ॥

अर्थ.—स्त्रियांचें आलिंगन इत्यादि ह्यापासून जें सुख होतें तोच पुरुषार्थ आहे. ह्या सुखामध्यें दुःख मिसळलेलें असल्यामुळें तें पुरुषार्थ नाहीं असें ह्मणूं नये; कारण सुखाबरोबर असणारें जें दुःख तें जितकें टाळवेल तितकें टाळून आपल्याला नुसतें सुख जितकें मिळेल तितकें घेतलें पाहिजे. ह्यास उदाहरण, मासे धरणारा खवले व कांटा ह्यांसुद्धां मासा धरून आणितो आणि मग त्याच्यांतून जेवढें घेण्यासारखें असेल तेवढें घेऊन परततो; तसेंच ज्यास धान्य पाहिजे असेल तो कोंड्यासुद्धां धान्य आणून त्यांतून जेवढें घेण्यासारखें असेल

तेवढें घेऊन बसतो. ह्मणून अपणास जें सुख पाहिजे असेल तें दुःखाच्या भीतीनें टाकणें योग्य नाहीं. कारण, हरणें खातात ह्मणून मनुष्यें भात पेरीत नाहींत असें नाहीं. तसेंच भिकारी आहेत ह्मणून स्वयंपाक करण्याला ते चुलीवर भांडें ठेवीत नाहींत असें नाहीं. जर कोणी भित्रा मनुष्य प्रत्यक्ष असलेलें सुख टाकील, तर तो पशुप्रमाणें मूर्ख होईल. ह्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं,

"इंद्रियांचा विषयांशीं संयोग झाल्यापासून होणारें सुख मनुष्यानें दुःखयुक्त असल्यामुळें टाकावें हा मूर्खांचा विचार आहे."

अरे, पांढरे उत्तम तांदुळानें व कोंड्यानें युक्त असलेलें भात टाकण्याची इच्छा, आपले हिताची इच्छा करणारा असा कोण मनुष्य करील ?

**ननु पारलौकिकसुखाभावे बहुवित्तव्ययशरीरायाससाध्ये अग्निहोत्रादौ विद्यावृद्धाः कथं प्रवर्त्तिष्यन्ते इति चेत् तदपि न प्रमाणकोटिं प्रवेष्टुमीष्टे अनृतव्याघातपुनरुक्तदोषैर्दूषिततया वैदिकम्मन्यैरेव धूर्त्तबकैः परस्परं कर्म्मकाण्डप्रामाण्यवादिभिर्ज्ञानकाण्डस्य ज्ञानकाण्डप्रामाण्यवादिभिः कर्म्मकाण्डस्य च प्रतिक्षिप्तत्वेन त्रय्या धूर्त्तप्रलापमात्रत्वेन अग्निहोत्रादेर्जीविकामात्रप्रयोजनत्वात् । तथा चाभाणकः**

**अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ।**
**बुद्धिपौरुषहीनानां जीविकेति बृहस्पतिः ॥**

**अत एव कण्टकादिजन्यं दुःखमेव नरकं लोकसिद्धो राजा परमेश्वरः देहोच्छेदो मोक्षः । देहात्मवादे च कृशोऽहं कृष्णोऽहमित्यादिसामानाधिकरण्योपपत्तिः । मम शरीरमिति व्यवहारो राहोः शिर इत्यादिवदौपचारिकः ।**

अर्थ.—जर कोणी अशी शंका घेईल कीं, जर पारलौकिक सुख नाहीं, तर पुष्कळ द्रव्य खर्च करून व शरीराला श्रम देऊन अग्निहोत्र इत्यादि कर्मे करण्याविषयीं मोठाले विद्वान् लोक कसे प्रवृत्त होतील? तर (पारलौकिक सुख आहे ह्याविषयीं) हें प्रमाण ह्मणून

घेण्याजोगें नाहीं. कारण, वेदाला तीन दोष आहेत–१ अनृत ( म्ह० खोटें सांगणें ), २ व्याघात ( म्ह० आपल्या बोलण्यांत पूर्वापरविरोध असणें ) आणि ३ पौनरुक्त्य ( म्हणजे एकच गोष्ट पुनः पुनः सांगणें ). आणखी जे आपणांस वैदिक मानितात अशा बगळ्यांमारख्या लुच्चे लोकांमध्यें परस्पर असा तंटा आहे कीं, कर्मकांडाचे अभिमानी ज्ञानकांडाची निंदा करितात, व ज्ञानकांडाचे अभिमानी कर्मकांडाची निंदा करितात. ह्यास्तव वेद हे केवळ लुच्च्यांची बडबड आहे, आणि अग्निहोत्र इत्यादि हीं फक्त पोट भरण्याचीं साधनें म्हणून उपयोगी आहेत. ह्याविषयीं आभाणक असें म्हणतो कीं,

" बृहस्पति असें म्हणतो कीं, अग्निहोत्र, तीन वेद, त्रिदंडसंन्यास[१], व अंगाला भस्म चोपडणें हीं, ज्यांस बुद्धि व पराक्रम नाहीं त्यांच्या उपजीविकेचीं साधनें आहेत. "

**बृहस्पति असें म्हणतो कीं, अग्निहोत्र, तीन वेद, त्रिदंडसंन्यास, व अंगाला भस्म चोपडणें हीं, ज्यांस बुद्धि व पराक्रम नाहीं त्यांच्या उपजीविकेचीं साधनें आहेत.**

म्हणून कांटे इत्यादिकांपासून होणारें जें दुःख तोच नरक आहे. लोकांमध्यें जो राजा म्हणून प्रसिद्ध असतो तोच परमेश्वर आहे. देहाचा जो नाश तोच मोक्ष आहे. देह हाच आत्मा आहे असें मत स्वीकारिलें असतां, " मी रोड आहें, " " मी काळा आहें, " ह्या वाक्यांचा योग्य अर्थ होतो; आणि ज्याप्रमाणें राहु व त्याचें डोकें हीं एकच असून " राहूचें डोकें " असें रूपक अलंकार करून म्हणण्याची चाल आहे, त्याप्रमाणें " माझें शरीर " असें म्हणणेंही रूपक अलंकाराचें आहे.

तदेतत् सर्व्वं समग्राहि ।

अत्र चत्वारि भूतानि भूमिवार्य्यनलानिलाः ।
चतुर्भ्यः खलु भूतेभ्यश्चैतन्यमुपजायते ।
किण्वादिभ्यः समेतेभ्यो द्रव्येभ्यो मदशक्तिवत् ॥

---

१ म्हणजे ज्यांत शरीराला, वाणीला व मनाला दंड आहे असा संन्यास.

अहं स्थूलः कृशोऽस्मीति सामानाधिकरण्यतः ।
देहः स्थौल्यादियोगाच्च स एवात्मा न चापरः ॥
मम देहोऽयमव्यक्तिः सम्भवेदौपचारिकीति ॥

अर्थ.—ह्या सर्वांचा संग्रह पुढील श्लोकांत केला आहे—

" ह्या मताप्रमाणें पृथ्वी, आप, तेज व वायु हीं चार भूतें आहेत; जशी किण्व इत्यादि पदार्थांच्या मिश्रणानें मादक शक्ति उत्पन्न होते, तसें चार तत्वांपासून चैतन्य उत्पन्न होतें.

'मी लठ्ठ आहें,' 'मी रोड आहें' हे धर्म एकाच ठिकाणीं राहतात, आणि लठ्ठपणा इत्यादि धर्म देहामध्यें मात्र असतात, ह्मणून तोच आत्मा आहे दुसरा नाहीं.

' हा माझा देह आहे ' असें जें ह्मणतो तें अलंकारिक आहे. "

स्यादेतत् स्यादेषमनोरथो यद्यनुमानादेः प्रामाण्यं न स्यात् अस्ति च प्रामाण्यं कथमन्यथा धूमोपलम्भानन्तरं धूमध्वजे प्रेक्षावतां प्रवृत्तिरुपपद्येत । नद्यास्तीरे फलानि सन्तीति वचनश्रवणसमनन्तरं फलार्थिनां नदीतीरे प्रवृत्तिरिति ।

अर्थ.—( आस्तिक वादी असें ह्मणतो कीं, ) असें होईल. जर अनुमान इत्यादि ह्यांना प्रामाण्य नसेल, तर तुमच्या इच्छेप्रमाणें होईल. परंतु त्यांना प्रामाण्य आहे. तसें नसतें तर जो धूर पाहतो त्याच्या मनांत अग्नीची कल्पना कशी आली असती? किंवा ' नदीच्या कांठावर फळें आहेत ' असें कोणीं ह्मटलेलें ऐकून ज्याला फळाची इच्छा आहे त्याच्या मनांत तिकडे जाण्याचें कसें येईल ?

तदेतन्मनोराज्यविजृम्भणम् । व्याप्तिपक्षधर्म्मताशालि हि लिङ्गं गमकमभ्युपगतमनुमानप्रामाण्यवादिभिः व्याप्तिश्चोभयविधोपाधिविधुरः सम्बन्धः स च सत्तया चक्षुरादिवन्नाङ्गभावं भजते किन्तु ज्ञाततया । कः खलु ज्ञानोपायो भवेत् । न तावत् प्रत्यक्षं तच्च बाह्यमान्तरं वाभिमतम् । न प्रथमः तस्य सम्प्रयुक्तविषयज्ञानजनकत्वेन भवति प्रसरसम्भवेऽपि भूतभविष्यतोस्तदसम्भवेन सर्व्वोपसंहारवत्या व्याप्तेर्दुर्ज्ञानत्वात् । न च व्याप्तिज्ञानं सा-

मान्यगोचरमिति मन्तव्यं व्यक्त्योरविनाभावाभावप्रसङ्गात् । नापि चरमः अन्तःकरणस्य बहिरिन्द्रियतन्त्रत्वेन बाह्येऽर्थे स्वातन्त्र्येण प्रवृत्त्यनुपपत्तेः । तदुक्तम्

चक्षुराद्युक्तविषयं परतन्त्रं बहिर्मन इति ।

**अर्थ**.—( नास्तिक वादी असें ह्मणतो कीं, ) हें सर्व बोलणें मनःकल्पित आहे. ( नैय्यायिक अनुमान प्रमाण मानितात. त्यांची अनुमान करण्याची रीति अशी आहे कीं, " डोंगरावर अग्नि आहे, कारण तेथें धूर आहे, जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें अग्नि असतो, ह्यांस उदाहरण स्वयंपाकघर, तसा पर्वतावर धूर आहे, ह्मणून पर्वतावर अग्नि आहे. ह्यांत पर्वत ह्मणजे ज्यावर अग्नि आहे असें सिद्ध करावयाचें त्यास **पक्ष** ह्मणतात; अग्नि ह्मणजे पक्षावर जें आहे असें सिद्ध करावयाचें त्यास **साध्य** ह्मणतात; आणि धूर ह्मणजे पक्षावर साध्य सिद्ध करण्याला जें कारण त्यास **हेतु** किंवा **साधन** असें ह्मणतात. जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें अग्नि असतो. ह्या नियमाला **व्याप्ति** ह्मणतात. ह्मणून धूर हा **व्याप्य** आहे, आणि अग्नि हा **व्यापक** आहे. व्याप्य ह्मणजे धूर ह्याचें पर्वतावर ह्मणजे पक्षावर असणें ह्यास **पक्षधर्मता** ह्मणतात. अशा व्याप्तीनें युक्त असलेला धूर पर्वतावर ह्मणजे पक्षावर आहे, ह्या ज्ञानाला **व्याप्तिविशिष्टपक्षधर्मता** असें ह्मणतात. ह्या ज्ञानालाच **लिंगपरामर्श** असें ह्मणतात. ) नैय्यायिक असें कबूल करितात कीं, व्याप्तिविशिष्टपक्षधर्मता ह्मणजे लिंगपरामर्श हा अनुमान सिद्ध होण्याला अवश्य आहे. व्याप्तीला संदिग्ध उपाधि व निश्चित उपाधि ह्या दोहोंचा संबंध नसला पाहिजे. ( जर असें ह्मटलें कीं, जेथें जेथें अग्नि आहे तेथें तेथें धूर आहे, तर हें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, लाल तापविलेल्या लोखंडाच्या गोळ्यांत अग्नि असतो, परंतु तेथें धूर नसतो. धूर असण्याला आर्द्रेंधनसंयोग ह्मणजे ओल्या लांकडाचा संयोग लागतो. ह्मणून ह्या उदाहरणांत आर्द्रेंधनसंयोग हा उपाधि. ह्या उपाधीचा संबंध असल्यामुळें अनुमानाला दोष येतो. ) आतां डोळे इत्यादि ज्ञानेंद्रियांनीं असलेल्या पदार्थांचें जसें प्रत्यक्ष ज्ञान होतें, तसें व्याप्य आणि व्यापक ह्यांच्या संबंधाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं, तर

तो केवळ मनानें जाणिला जातो. असें आहे तर कोणत्या उपायानें त्यासंबंधाचें ज्ञान होईल? प्रत्यक्ष प्रमाणानें त्याचें ज्ञान होत नाहीं (असें प्रथम सिद्ध करतो). प्रत्यक्ष दोन प्रकारचें आहे—१ बाहेरील, व २ आंतील. आतां बाहेरील प्रत्यक्षानें त्याचें ज्ञान होत नाहीं. कारण इंद्रियांचा पदार्थाशीं जेव्हां संयोग असतो तेव्हां त्या पदार्थाचें प्रत्यक्ष ज्ञान होतें. ( उदाहरण, जेव्हां आपण चुलींत धूर व अग्नि पाहातो तेव्हां त्यांच्या संबंधाचें प्रत्यक्ष ज्ञान होतें ). जरी ह्याप्रमाणें हल्लीं असलेल्या संबंधाचें ज्ञान होतें, तरी पाठीमागें असलेल्या व पुढें असणाऱ्या संबंधाचें ज्ञान होण्याचा संभव नाहीं. ह्मणून ( धूर व अग्नि ह्यांचा नेहमीं असणाऱ्या संबंधाचें ज्ञान बाहेरील प्रत्यक्षानें होत नसल्यामुळें ) व्याप्तीचें ज्ञान बाहेरील प्रत्यक्षानें होत नाहीं. आणखी व्याप्तिज्ञान हें सामान्याचें प्रत्यक्ष आहे असेंहीं ह्मणतां येत नाहीं. कारण, तसें ह्मटलें तर व्यक्तींच्या ठिकाणीं व्याप्ति असल्याचें ज्ञान होणार नाहीं; ( ह्मणजे अमुक एका ठिकाणीं धूर पाहिला असता त्या ठिकाणीं अग्नि आहे असें ज्ञान होणार नाहीं ). आतां व्याप्तीचें ज्ञान आंतील प्रत्यक्षानेंही होत नाहीं. कारण, अंतःकरण ह्मणजे मन हें बाहेरील इंद्रियाचे स्वाधीन आहे. ( मनाला बाहेरील पदार्थांचें ज्ञान होण्याला मनाचा बाहेरील इंद्रियाशीं संयोग झाला पाहिजे व बाहेरील इंद्रियाचा त्या पदार्थाशीं संयोग झाला पाहिजे. ) ह्मणून बाहेरील पदार्थाकडे मनाची प्रवृत्ति स्वतंत्रपणानें होत नसल्यामुळें ( आंतील प्रत्यक्षानेंही व्याप्तीचें ज्ञान होत नाहीं ). ह्याविषयीं असें वचन आहे कीं,

"ज्यांचे विषय सांगितले ते चक्षुरादिक आहेत. मन बाहेरील विषयाविषयीं परतंत्र आहे."

**नाप्यनुमानं व्याप्तिज्ञानोपायः तत्र तत्राप्येवमिति अनवस्थादौस्थ्यप्रसङ्गात् । नापि शब्दस्तदुपायः काणादमतानुसारेणानुमान एवान्तर्भावात् अनन्तर्भावे वा वृद्धव्यवहाररूपलिङ्गावगतिसापेक्षतया प्रागुक्तदूषणलङ्घनाजङ्घालत्वात् धूमधूमध्वजयोरविनाभावोऽस्तीति वचनमात्रे मन्वादिवद् विश्वासाभावाच्च । अनुप-**

दिष्टाविनाभावस्य पुरुषस्यार्थान्तरदर्शनेनार्थान्तरानुमित्यभावे स्वार्थानुमानकथायाः कथाशेषत्वप्रसङ्गाच्च ।

अर्थ.—व्याप्तीचें ज्ञान होण्याला अनुमान हें साधन आहे असें-ही ह्मणतां येत नाहीं. कारण, ह्या अनुमानालाही व्याप्तीचें ज्ञान पाहिजे, आणि असें झालें असतां अनवस्था दोष येतो. ( ह्मणजे एका अनुमानाला दुसरें अनुमान, दुसऱ्या अनुमानाला तिसरें अनुमान, ह्याप्रमाणें कधींहीं अनुमान संपणार नाहीं. ) आणखी व्याप्तीचें ज्ञान होण्याला शब्द हें साधन आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण, कणादाच्या वैशेषिक मताप्रमाणें अनुमानांतच शब्दाचा अंतर्भाव होतो. जर अनुमानांत शब्दाचा अंतर्भाव होत नाहीं असें ह्मटलें, तर अनुमानप्रमाणाला वर जी हरकत सांगितली ती शब्दप्रमाणानें दूर होत नाहीं असें होतें; कारण, वृद्ध मनुष्याचा व्यवहार कसा होतो हें पाहणें शब्दज्ञानाला जरूर आहे. ( जसें कोणी एक ह्मातारा मनुष्य दुसऱ्या तरुण मनुष्याला ' गाय आण ' असें ह्मणतो, त्या तरुण मनुष्यानें गाय हा पदार्थ आणिला ह्मणजे गाय हा शब्द कोणत्या पदार्थाला लागतो हें अज्ञान मुलांना समजतें. ) आणखी जसें मनू इत्यादिकांचें वचन विश्वास ठेवण्यास योग्य नाहीं तसें जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें अग्नि असतो असें दुसऱ्याचें वचनही विश्वास ठेवण्यास योग्य नाहीं. आणखी जर व्याप्तीचें ज्ञान होण्याला शब्दप्रमाण येवढेंच साधन आहे असें ह्मटलें, तर जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें अग्नि असतो हा नियम ज्या मनुष्याला दुसऱ्यानें सांगितला नसेल त्या मनुष्याला धूर पाहून अग्नीचें अनुमान होणार नाहीं. ह्मणून आपण आपल्या समजुतीकरितां अनुमान करितों ही गोष्ट व्यर्थ आहे.

उपमानादिकन्तु दूरापास्तं तेषां संज्ञासंज्ञिसम्बन्धादिबोधकत्वेनानौपाधिकसम्बन्धबोधकत्वासम्भवात् । किञ्च उपाध्यभावोऽपि दुरवगमः उपाधिना प्रत्यक्षत्वनियमासम्भवेन प्रत्यक्षाणामभावस्य प्रत्यक्षत्वेऽपि अप्रत्यक्षाणामभावस्याप्रत्यक्षतया अनुमानाद्यपेक्षायामुक्तदूषणानतिवृत्तेः ।

**अर्थ.**—( **उपमान** ह्मणजे सारखेंपणाचें ज्ञान. उदाहरण, कोणा-एका मनुष्याला वनगाय हा पशु माहीत नव्हता, त्यानें रानांतील एकास विचारल्यावरून तो तो गायीसारखा असतो असें त्यास समजलें. नंतर रानांत गेल्यावर त्यानें गायीसारखा एक पशु पाहिला, तेव्हां रानांतील मनुष्यानें जें सांगितलें होतें त्याचें स्मरण होऊन हाच पशु वनगाय आहे असें गायीच्या सारखेपणावरून ज्ञान झालें. ह्या ज्ञानास **उपमिति** असें ह्मणतात. ) आतां व्याप्तीचें ज्ञान होण्याला उपमान इत्यादि साधनांचा तर मुळींच उपयोग नाहीं. कारण, ह्या साधनानें फक्त शब्द व त्याचा अर्थ ह्यांच्या संबंधाचें ज्ञान होत असल्यामुळें उपाधिरहित संबंधाचें ज्ञान होण्याचा संभव नाहीं. आणखी उपाधि नाहीं असेंही ज्ञान होऊं शकत नाहीं; कारण, सर्व उपाधींचें प्रत्यक्ष ज्ञान होण्याचा संभव नाहीं. ह्मणून जरी प्रत्यक्ष ज्ञानाच्या अभावाचें प्रत्यक्ष ज्ञान होतें, तरी प्रत्यक्ष नसणाऱ्या ज्ञानाच्या अभावाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं. ( जसें खुंटीवर पागोटें नसलें ह्मणजे तेथें पागोट्याच्या अभावाचें प्रत्यक्ष ज्ञान होतें, परंतु पिशाच्याचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं. आणि पिशाचाच्या अभावाचेंही प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं. ) ह्या कारणास्तव अनुमान इत्यादिकांची जरूर लागत असल्यामुळें पूर्वीं अनुमान इत्यादिकांना जे दोष दिले ते जात नाहींत.

**अपि च साधनाव्यापकत्वे सति साध्यसमव्याप्तिरिति तल्लक्षणं कक्षीकर्त्तव्यम् । तदुक्तम्**

**अव्याप्तसाधनो यः साध्यसमव्याप्तिरुच्यते स उपाधिरिति ।**

**शब्देऽनित्यत्वे साध्ये सकर्तृकत्वं घटत्वमश्रावणतां च व्यावर्त्तयितुमुपात्तान्यत्र क्रमतो विशेषणानि त्रीणि । तस्मादिदमनवद्यं समासमेत्यादिनोक्तमाचार्य्यैश्चेति ( १ ) । तत्र विध्यध्यवसायपूर्व्वकत्वान्निषेधाध्यवसायस्योपाधिज्ञाने जाते तदभावविशिष्टसम्बन्धरूपं व्याप्तिज्ञानं व्याप्तिज्ञानाधीनं चोपाधिज्ञानमिति परस्पराश्रयवज्रप्रहारदोषोवज्रलेपायते । तस्मादविनाभावस्य**

---

( १ ) समासमाविनाभावावेकत्र स्तो यदा तदा ।
समेन यदि नो व्याप्तस्तयोर्हीनोऽप्रयोजकः ॥

दुर्बोधतया नानुमानाद्यवकाशः । धूमादिज्ञानानन्तरमग्न्यादिज्ञाने प्रवृत्तिः प्रत्यक्षमूलतयाभ्रान्त्या वा युज्यते । क्वचित् फलप्रतिलम्भस्तु मणिमन्त्रौषधादिवत् यादृच्छिकः । अतस्तत्साध्यमदृष्टादिकमपि नास्ति । नन्वदृष्टानिष्टौ जगद्वैचित्र्यमाकस्मिकं स्यादिति चेत् न तद्भद्रं स्वभावादेव तदुपपत्तेः । तदुक्तम्

अग्निरुष्णो जलं शीतं शीतस्पर्शस्तथानिलः ।
केनेदं चित्रितं तस्मात् स्वभावात्तद्व्यवस्थितिरिति ॥

तदेतत् सर्व्वं बृहस्पतिनाप्युक्तम् ।

न स्वर्गो नापवर्गो वा नैवात्मा पारलौकिकः ।
नैव वर्णाश्रमादीनां क्रियाश्च फलदायिकाः ॥ १ ॥
अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ।
बुद्धिपौरुषहीनानां जीविका धातृनिर्म्मिता ॥ २ ॥
पशुश्चेन्निहतः स्वर्गं ज्योतिष्टोमे गमिष्यति ।
स्वपिता यजमानेन तत्र कस्मान्न हिंस्यते ॥ ३ ॥
मृतानामपि जन्तूनां श्राद्धं चे तृप्तिकारणम् ।
गच्छतामिह जन्तूनां व्यर्थं पाथेयकल्पनम् ॥ ४ ॥
स्वर्गस्थिाता यदा तृप्तिं गच्छेयुस्तत्र दानतः ।
प्रासादस्योपरिस्थानामत्र कस्मान्न दीयते ॥ ५ ॥
यावज्जीवेत् सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥ ६ ॥
यदि गच्छेत् परं लोकं देहादेष विनिर्गतः ।
कस्माद्भूयो न चायाति बन्धुस्नेहसमाकुलः ॥ ७ ॥
ततश्च जीवनोपायो ब्राम्हणैर्विहितस्त्विह ।
मृतानां प्रेतकार्य्याणि न त्वन्यद्विद्यते क्वचित् ॥ ८ ॥
त्रयो वेदस्य कर्तारो भण्डधूर्तनिशाचराः ।
जर्फरीतुर्फरीत्यादि पण्डितानां वचः स्मृतम् ॥ ९ ॥
अश्वस्यात्र हि शिश्नन्तु पत्नीग्राह्यं प्रकीर्त्तितम् ।
भण्डैस्तद्वत् परञ्चैव ग्राह्यजातं प्रकीर्तितम् ॥ १० ॥
मांसानां खादनं तद्वन्निशाचरसमीरितमिति ॥

**तस्माद्बहूनां प्राणिनामनुग्रहार्थं चार्व्वाकमतमाश्रयणीयमिति रमणीयम् ॥**

**इति सायणमाधवीये सर्व्वदर्शनसङ्ग्रहे चार्व्वाकदर्शनम् ॥**

**अर्थ.**—आणखी उपाधीचें लक्षण असें आहे कीं, साध्याला व्यापणारें असून साधनाला न व्यापणारें जें तें. जर असें ह्मटलें कीं, पर्वतावर धूर आहे, कारण तेथें अग्नि आहे, तर येथें धूर हा साध्य आहे आणि अग्नि हा साधन आहे. हें अनुमान बरोबर नाहीं. कारण, लाल तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यांत अग्नि असतो, परंतु तेथें धूर नसतो. जर अग्नीला ओल्या लांकडाचा संयोग असेल तर मात्र तेथें धूर असतो. ह्मणून ओल्या लांकडांचा संयोग हा उपाधि आहे. ह्या उपाधीस वरील लक्षण असें लागतें कीं, जेथें जेथें धूर आहे तेथें तेथें ओल्या लांकडांचा संयोग आहे; ह्मणजे, ओल्या लांकडांचा संयोग हा उपाधि नेहमीं धुराला ह्मणजे साध्याला व्यापून असतो; आणि लाल तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यांत अग्नि असतो, परंतु तेथें ओल्या लांकडांचा संयोग नसल्यामुळें धूर नसतो, ह्मणून ओल्या लांकडांचा संयोग हा उपाधि अग्नि ह्मणजे साधन ह्याला नेहमीं व्यापून नसतो. उपाधीविषयीं असें सांगितलें आहे कीं,—

"जो साधनाला व्यापून राहात नाहीं व साध्याला नेहमीं व्यापून असतो त्यास उपाधि ह्मणतात."

ह्यावरून असें स्पष्ट आहे कीं, उपाधीला तीन गोष्टी अवश्य आहेत, त्या ह्या—( १ ) जेथें जेथें **साधन** असतें तेथें तेथें **उपाधि** नसला पाहिजे, ( २ ) जेथें जेथें **साध्य** असतो तेथें तेथें **उपाधि** असला पाहिजे, आणि ( ३ ) जेथें जेथें **उपाधि** असतो तेथें तेथें **साध्य** असला पाहिजे. नैय्यायिक असें न्यायवाक्य ह्मणतात कीं, "शब्द हा अनित्य आहे, कारण शब्दाचे ठिकाणीं शब्दत्व आहे." ( जर उपाधीचें लक्षण करण्याला पहिली गोष्ट घेतली नाहीं आणि दुसरी व तिसरी ह्या दोनच गोष्टी घेतल्या तर, सकर्तृकत्व ह्या मीमांसक उपाधीच्या ठिकाणीं व्यभिचार येतो, कारण, जेथें जेथें अनित्यत्व

आहे तेथें तेथें सकर्तृकत्व आहे, आणि जेथें जेथें सकर्तृकत्व आहे तेथें तेथें अनित्यत्व आहे; परंतु जर आणखी पहिलीही गोष्ट घेतली तर शब्दावर शब्दत्व असून तेथें सकर्तृकत्वही आहे, ह्या कारणानें सकर्त्तृकत्व हा उपाधि होत नाहीं. आतां जर उपाधीचें लक्षण करण्याला पहिली आणि तिसरी ह्या दोनच गोष्टी घेतल्या, तर घटत्व हा उपाधि होतो; कारण, पहिल्या गोष्टीप्रमाणें शब्दावर शब्दत्व असून तेथें घटत्व नाहीं, आणि तिसऱ्या गोष्टीप्रमाणें घटावर घटत्व असून तेथें अनित्यत्व आहे; परंतु जर दुसरी गोष्ट घेतली, तर जेथें जेथें अनित्यत्व आहे तेथें तेथें घटत्व असलें पाहिजे. परंतु तसें नसून घटत्व हा धर्म फक्त घटावर आहे, ह्मणून उपाधीच्या लक्षणांतील तिन्ही गोष्टी विचारांत घेतल्या असतां घटत्व हा उपाधि होत नाहीं. आतां जर उपाधीचें लक्षण करण्याला पहिली आणि दुसरी ह्या दोन च गोष्टी घेतल्या, तर अश्रावणता ( ह्मणजे ऐकूं न येणेंपणा ) हा मीमांसक उपाधि होतो; कारण पहिल्या गोष्टीप्रमाणें शब्दावर शब्दत्व आहे, परंतु तेथें अश्रावणता नाहीं, आणि दुसऱ्या गोष्टीप्रमाणें जेथें जेथें अनित्यत्व आहे तेथें तेथें अश्रावणता आहे, परंतु जर तिसरी गोष्ट घेतली, तर जेथें जेथें अश्रावणता आहे तेथें तेथें अनित्यत्व आहे असें ह्मणतां येत नाहीं, कारण, आकाशावर अश्रावणता आहे, परंतु तेथें अनित्यत्व नाहीं, ह्मणून उपाधीच्या लक्षणांतील तिन्ही गोष्टी विचारांत घेतल्या असतां अश्रावण हा उपाधि होत नाहीं. ) ह्मणून शब्दांवर अनित्यत्व साधण्याचें असल्यास सकर्तृकत्व, घटत्व आणि अश्रावणता ह्या तीन उपाधी घालविण्यास्तव क्रमानें तीन विशेषणें ( ह्मणजे तीन गोष्टी ) घेतलीं पाहिजेत. ह्मणून उपाधीला साध्यसमव्याप्ति असणें आणि अव्याप्तसाधन असणें आवश्यक आहे. उदयनाचार्यांनेंही ‘ समासम ’ इ० श्लोकानें हेंच सांगितलें आहे. कोणत्या एका उपाधीच्या अभावाचें ज्ञान होण्यापूर्वीं त्या उपाधीचें ज्ञान असलें पाहिजे. ह्मणून उपाधीचें ज्ञान असल्यास मात्र व्याप्तीचें ज्ञान होऊं शकेल. आणखी व्याप्तीचें ज्ञान असल्यास उपाधीचें ज्ञान होऊं शकेल. ह्याप्रमाणें अन्योन्याश्रय हा जो जब्बर दोष येतो

तो वज्रलेप होतो. ह्मणून व्याप्तीचें ज्ञान होणें फार कठीण असल्यामुळें ज्ञान होण्याला अनुमानाचा उपयोग नाहीं. धूर इत्यादिकांचें ज्ञान झाल्यावर अग्नि इत्यादिकांकडे जी मनाची प्रवृत्ति होते ती पूर्वीच्या प्रत्यक्ष ज्ञानावरून होते किंवा भ्रांतीनें होते; आणि ह्या प्रवृत्तीप्रमाणें केव्हां केव्हां जो अनुभव येतो तो, मणि मंत्र औषध इत्यादिकांच्या अनुभवाप्रमाणें केवळ आकस्मिक आहे. ह्यावरून ज्याचें ज्ञान अनुमानानें व्हावयाचें असें अदृष्ट इत्यादि ( ह्मणजे, धर्म अधर्म इत्यादि) कांहीं नाहींत. जर कोणीं असें ह्मणेल कीं, अदृष्ट नसल्यास जगांत जे नानाप्रकार आढळतात ( त्यांना कांहीं कारण नसून ) ते आकस्मिक आहेत, तर हें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, पदार्थांचे जे स्वभाव आहेत ( ह्मणजे, त्यांच्या मध्यें जे धर्म आहेत ) त्यांमुळें ते नानाप्रकार उत्पन्न होतात असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्याविषयीं असा श्लोक आहे कीं,—

" अग्नि उष्ण आहे, पाणी थंड आहे, व वारा गार लागतो.
हें वैचित्र्य कोणीं उत्पन्न केलें? कोणीही नाहीं;तर तें स्वभावतःहोतें."

हें सर्व बृहस्पतीनेंही सांगितलें आहे तें असें—

" स्वर्ग नाहीं,मोक्ष नाहीं,अथवा परलोकीं जाणारा असा आत्माही नाहीं.
वर्ण, आश्रम, इत्यादि ह्यांच्या क्रियांपासून कांहीं फळ उत्पन्न होत नाहीं ॥ १ ॥

अग्निहोत्र, तीन वेद, त्रिदंडसंन्यास, भस्म चोपडणें, हीं
ज्यांस बुद्धि व पराक्रम नाहीं त्यांचीं पोट भरण्याचीं साधनें निर्माण केलीं आहेत ॥ २ ॥

जर ज्योतिष्टोम यज्ञामध्यें मारलेला पशु स्वर्गास जातो,
तर त्या यज्ञांत यजमानानें आपला बाप कां मारूं नये? ॥ ३ ॥

जर मेलेल्या प्राण्यांचीही तृप्ति श्राद्ध करण्यानें होतें,
तर ह्या लोकीं गांवास जाणाऱ्यांनीं बरोबर फराळाचें व्यर्थ कां घ्यावें ? ॥ ४ ॥

जर येथें दान केल्यानें स्वर्गांत पितरांची तृप्ति होते,

[stamp] ६६७५



तर घराचे खालच्या मजल्यांत केलेलें दान वरचे मजल्यांतल्यांस
कां पोहचूं नये? ॥ ५ ॥

जीवंत असेतोंपर्यंत सुखानें राहावें व कर्ज काढून तूप खावें.
ज्या देहाची राख झाली तो पुनः कशाचा येतो ? ॥ ६ ॥
जर आत्मा देहांतून निघून परलोकाला जातो,
तर तो आपले बंधु इत्यादिकांच्या स्नेहास्तव पुनः कां येत नाहीं?॥७॥
ह्यास्तव ब्राह्मणांनीं हीं पोट भरण्याचीं साधनें केलीं आहेत.
तीं अशीं कीं, मेलेल्यांची क्रिया करावी, ह्याचें दुसरें कांहीं प्रयो-
जन नाहीं ॥ ८ ॥
वेदाचे कर्त्ते तीन आहेत, भांड, लुच्चा व राक्षस,
" जर्भरी तुर्फरी[1] " इत्यादि वाक्य पंडितांनीं केलेलें आहे ॥ ९ ॥

राजपत्नीनें घोड्याचें शिश्न ग्रहण करावें अशीं अश्वमेधांत जीं बी-
भत्स कर्में आहेत तीं भांडांनीं सांगितलीं आहेत. तसेंच, दुसरे जे
पदार्थ घेण्याचे तेंही त्यांनींच सांगितलें आहे ॥ १० ॥"

आणखी त्याचप्रमाणें राक्षसांनीं मांस खाण्याचें सांगितलें आहे.

**अत्र बौद्धैरभिधीयते यदभ्यधायि अविनाभावो दुर्बोध इति तदसाधीयः तादात्म्यतदुत्पत्तिभ्यामविनाभावस्य सुज्ञानत्वात् । तदुक्तम्—**

**कार्य्यकारणभावाद्वा स्वभावाद्वा नियामकात् ।**
**अविनाभावनियमो दर्शनान्तरदर्शनादिति ॥**

**अर्थ.**—ह्मणून बहुतेक प्राण्यांवर कृपा करण्याकरितां चार्वाकाच्या मताचा स्वीकार करावा. ह्याप्रमाणें हें सुखदायक मत आहे.

ह्याप्रमाणें सायणमाधवानें केलेल्या सर्वदर्शनसंग्रह ग्रंथांतील चा-
र्वाकमत संपलें.

---

१ ऋग्वेद संहिता अ० ८ अ० ६ व० २ ऋ० १ ह्यांत असें आहे कीं,

सृण्येवजर्भरी तुर्फरी तूनैतोशेवतुर्फरीपर्फरीका ।

इच्छा ह्मणजे सुख पाहिजे असें वाटणें ॥ ७ ॥

द्वेष ह्मणजे दुःख नसण्याची इच्छा ॥ ८ ॥

संस्कार चालत आल्यामुळें विद्वानाला ही जी शरीराची प्रतीति असते ती अभिनिवेश ॥ ९ ॥

चित्ताची उलटी भावना करून जे टाकण्यास योग्य ते सूक्ष्म आहेत ॥ १० ॥

त्यांच्या वृत्ती ध्यानानें टाकण्यास योग्य आहेत ॥ ११ ॥

ज्यांचें मूळ क्लेश आहेत अशा कर्मांचा समुदाय ह्या जन्मीं अनुभवण्यास योग्य आहे ॥ १२ ॥

( क्लेश हे ) मूळ असतां त्यांचें फळ, जाति, आयुष्य, व भोग होतात ॥ १३ ॥

ते पुण्य किंवा पाप ह्यांपासून जसे झाले असतील तसे त्यांपासून आनंद किंवा दुःख हीं फळें होतात ॥ १४ ॥

ह्यापुढें येणाऱ्या, हल्लीं असणाऱ्या, व मागें अनुभविलेल्या अशा दुःखाच्या योगानें आणि गुणांच्या वृत्तींत परस्पर विरोध असण्याच्या योगानें विवेकी मनुष्याला सर्व दुःखच आहे॥१५॥

प्राप्त न झालेलें दुःख टाकण्यास योग्य आहे ॥ १६ ॥

दुःखाचें कारण आत्मा व चित्त ह्यांचा संयोग आहे ॥ १७ ॥

जें प्रकाश, क्रिया, व स्थिति ह्यांचे ठिकाणीं असतें व जें पंचभूतें व इंद्रियें ह्यांनीं झालेलें आहे असें जें दृश्य ( ह्म० चित्त ) तें भोग व मोक्ष ह्यांकरितां आहे ॥ १८ ॥

विशेष, अविशेष, लिंगमात्र, आणि अलिंग हे गुणांचे विभाग आहेत ॥ १९ ॥

आत्मा केवळ ज्ञानरूप आहे. तो शुद्ध असतांही प्रत्ययाच्या मागून जाणारा आहे ॥ २० ॥

दृश्याचा आत्मा त्याकरितांच आहे ॥ २१ ॥

मुक्तांना नष्ट झाली तरी दुसऱ्यांना नष्ट होत नाहीं, कारण सर्वांना साधारण आहे ॥ २२ ॥

क्र. ६५



भोग व भोक्ता ह्यांच्या स्वरूपाचें ज्ञान होण्याला कारण संयोग आहे ॥ २३ ॥
त्याचें कारण अविद्या ॥ २४ ॥
ती अविद्या नाहींशीं झाली असतां संयोग नाहींसा होतो, ह्याला **हान** ह्मणतात. हें आत्म्याचें कैवल्य आहे ॥ २५ ॥
अखंड भेदज्ञान होणें हा संयोग नाहींसा करण्याचा उपाय आहे ॥ २६ ॥
त्याचें शेवटल्या पाहेरीपर्यंत सात प्रकारचें ज्ञान आहे ॥ २७ ॥
योगाच्या अंगांचा अभ्यास करून अशुद्धीचा नाश झाला असतां भेदज्ञान होईपर्यंत ज्ञानाचा प्रकाश होतो ॥ २८ ॥
यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि हीं योगाचीं आठ अंगें आहेत ॥ २९ ॥
यम ह्मणजे हिंसा न करणें, सत्य बोलणें, चोरी न करणें, ब्रह्मचर्य असणें, आणि भोग साधन न घेणें ॥ ३० ॥
हे जाति, देश, काळ, व संयम, ह्यानीं मर्यादित नसून सर्वत्र लागू असणारें असें मोठें व्रत आहे ॥ ३१ ॥
नियम ह्मणजे शुद्धता, संतोष, तप, स्वाध्याय, आणि ईश्वरप्रणिधान ॥ ३२ ॥
वितर्कांचा बाध करण्याविषयीं त्याच्या उलट भावना करावी ॥३३॥
केलेले, करविलेले आणि अनुमोदन दिलेले, असे हिंसादिक वितर्क मग ते लोभ, क्रोध व मोह ह्यांपासून उत्पन्न झालेले असोत किंवा मृदु, मध्य, अधिमात्र असोत, त्यांचीं दुःख व अज्ञान अशीं अनंत फळें आहेत ॥ ३४ ॥
हिंसा न करण्याचा पूर्ण अभ्यास झाला असतां त्याच्या जवळ द्वेष नाहींसा होतो ॥ ३५ ॥
सत्यपणाचा पूर्ण अभ्यास झाला असतां कर्माचें फळ मिळतें॥३६॥
चोरी न करण्याचा अभ्यास पूर्ण झाला असतां त्याच्या जवळ सर्व रत्नें येतात ॥ ३७ ॥
ब्रह्मचर्य व्रताचा पूर्ण अभ्यास झाला असतां बळ मिळतें ॥३८॥

भोगसाधन न घेण्याचा पूर्ण अभ्यास झाला असतां पूर्वजन्मांचें ज्ञान होतें ॥ ३९ ॥
शुद्धतेचा पूर्ण अभ्यास झाला असतां आपल्या अंगाचा तिरस्कार येतो व दुसऱ्याच्या अंगाशीं संपर्क ठेवीत नाहीं ॥ ४० ॥
आणखीं सत्वशुद्धि, प्रसन्नमन, एकाग्रता, इंद्रियजय, व आत्मसाक्षात्कार हीं ( शुद्धतेचीं फळें) ॥ ४१ ॥
संतोषापासून अति उत्तम सुख मिळतें ॥ ४२ ॥
तपापासून अशुद्धीचा नाश होऊन शरीराचीं इंद्रियें पूर्ण होतात ॥ ४३ ॥
स्वाध्यायापासून(ह्म॰ मंत्रजपापासून) इष्ट देवतेचें दर्शनहोतें॥४४॥
ईश्वराच्या भक्तीपासून समाधि सिद्ध होतो ॥ ४५ ॥
आसन ह्मणजे जें स्थिर व सुखकारक तें ॥ ४६ ॥
प्रयत्न सईल सोडल्यानें व अनंताचे ठिकाणीं समापत्ति केल्यानें (आसन) स्थिर व सुखकारक होतें ॥ ४७ ॥
त्यानंतर शीतोष्णादिक द्वंद्वांपासून उपद्रव होत नाहीं ॥ ४८ ॥
तें झालें असतां श्वास व उच्छ्वास ह्यांची गति मोडणें ह्मणजे प्राणायाम होतो ॥ ४९ ॥
तो ( प्राणायाम ) तर वायु बाहेर सोडण्याचा आंत घ्यावयाचा व अटकवून ठेवण्याचा असा असून देश, काल, व संख्या येणेंकरून सूक्ष्म किंवा दीर्घ असतो ॥ ५० ॥
बाहेरील व आंतील मर्यादेकडे लक्ष्य देऊन केलेला प्राणायाम चौथा आहे ॥ ५१ ॥
तेणेंकरून चित्ताचें ( क्लेशरूप ) आच्छादन नाहींसें होतें॥५२॥
आणि धारणा करण्याची मनाला योग्यता येते ॥ ५३ ॥
प्रत्याहार ह्मणजे इंद्रियांची आपआपल्या विषयाकडे प्रकृति न होतां ती चित्ताच्या स्वरूपाला अनुसरून असणें ॥ ५४॥
त्या योगानें इंद्रियें वश होतात ॥ ५५ ॥

## विभूतिपाद.

एका ठिकाणीं चित्त लावणें ह्मणजे धारणा ॥ १ ॥

त्या ठिकाणीं ज्ञान एकाग्र करणें ह्मणजे ध्यान ॥ २ ॥
तें ध्यान केवळ एका पदार्थाविषयीं होत असून आपल्या स्वरूपाचें ज्ञान नसल्याप्रमाणें असतें ह्यास समाधि ह्मणतात ॥३॥
हे तीन एका ठिकाणीं असले ह्मणजे संयम होतो ॥ ४ ॥
तो जिंकला असतां ज्ञानशक्ति वाढते ॥ ५ ॥
त्याचा चित्तवृत्तीच्या ठिकाणीं उपयोग करावा ॥ ६ ॥
पूर्वींच्यापेक्षां हीं तीन अंगें साक्षात् उपयोगाचीं आहेत ॥ ७ ॥
तीं हीं निर्बीज ( समाधि ) परंपरेनें उपयोगीं पडणारीं आहे ॥८॥
जेव्हां व्युत्थानसंस्कार अशक्त होऊन निरोधसंस्कार प्रगट होतो तेव्हां निरोधाच्या संस्काराकडे चित्ताचा संबंध पोंचणें ह्यास निरोधपरिणाम ह्मणतात ॥ ९ ॥
( ह्या ) संस्कारापासून चित्ताचा ओघ शांत वाहतो ॥ १० ॥
चित्त सर्व पदार्थांकडे जाण्याचा नाश होऊन तें एकाच पदार्थावर राहूं लागलें ह्मणजे समाधीचा परिणाम घडतो ॥ ११ ॥
पूर्वीं गेलेली व हल्लीं असलेली अशा चित्ताच्या दोन वृत्तींचें सारखें ज्ञान झालें असतां चित्ताची एकाग्रता हा परिणाम घडतो ॥ १२ ॥
येणेंकरून पंचभूतें व इंद्रियें ह्यांचे धर्म, लक्षण, व अवस्था हे तीन परिणाम सांगितले असें होतें ॥ १३ ॥
शांत ( ह्मणजे गेलेला), उदित (ह्मणजे हल्लीं असलेला ), आणि अव्यपदेश्य ( ह्मणजे पुढें प्रगट होणारा ) धर्म ज्यास असतात तो धर्मी ॥ १४ ॥
क्रम निराळा असणें हे ( धर्मींचे ) परिणाम निरानिराळे होण्याचें कारण आहे ॥ १५ ॥
तीन परिणामांचे ठिकाणीं संयम केला असतां भूत व भविष्य ह्यांचें ज्ञान होतें ॥ १६ ॥
शब्द, अर्थ व ज्ञान ह्यांचा परस्परांचा भिन्नपणा न समजल्यास गोंधळ होतो, आणि त्यांचा भिन्नपणा समजून, त्या ठिकाणीं संयम केल्यास सर्व प्राण्यांचे शब्द समजतात ॥ १७ ॥

संस्काराकडे चित्त पोंचाविल्यास पूर्वींच्या जातींचें ज्ञान होतें॥१८॥
दुसऱ्याचे चित्तावर संयम करणाऱ्याला त्याचें चित्त समजतें॥१९॥
दुसऱ्याचे चित्तांतील विशेष पदार्थ संयमाचा विषय न केल्यास त्याच ज्ञान होत नाहीं॥ २० ॥
शरीराच्या रूपाच्या ठिकाणीं संयम केल्यापासून रूप पाहण्याच्या शक्तीचा प्रतिबंध झाला असतां डोळा व प्रकाश ह्यांचा संयोग न झाल्यामुळें योगी लोकांना दिसत नाहीं ॥ २१ ॥
कर्म सोपक्रम व निरुपक्रम असें दोन प्रकारचें आहे, त्यावर संयम केल्यापासून अथवा अरिष्टापासून आपल्या मरणाचें ज्ञान होतें ॥ २२ ॥
मैत्री इत्यादिकांचे ठिकाणीं (संयम केल्यानें) बल प्राप्तहोतें॥२३॥
(हत्तीच्या) बळांत संयम केल्यानें त्याचें बळ प्राप्त होतें ॥२४॥
प्रवृत्तीच्या प्रकाशांत संयम केल्यानें सूक्ष्म आच्छादिलेलें व दूरच्या पदार्थाचें ज्ञान होतें ॥ २५ ॥
सूर्याचे ठिकाणीं संयम केल्यास भुवनांचें ज्ञान होतें ॥ २६ ॥
चंद्राचे ठिकाणीं संयम केल्यास तारागणाचें ज्ञान होतें ॥ २७ ॥
ध्रुवाचे ठिकाणीं संयम केल्यास ताऱ्यांच्या गतींचें ज्ञान होतें ॥२८॥
नाभिचक्राचे ठिकाणीं संयम केल्यास शरीराच्या रचनेचें ज्ञान होतें ॥ २९ ॥
गळ्यांतील खळगीच्या ठिकाणीं संयम केल्यास भूक व तहान हीं नाहींशीं होतात ॥ ३० ॥
कूर्मनाडीच्या ठिकाणीं संयम केल्यास स्थिरता येते ॥ ३१ ॥
डोक्यांतील ज्योतीच्या ठिकाणीं संयम केल्यास सिद्धांचें दर्शन होतें ॥ ३२ ॥
प्रतिभेपासून झालेल्या ज्ञानाचे ठिकाणीं संयम केल्यास सर्व ज्ञान होतें ॥ ३३ ॥
हृदयाचे ठिकाणीं संयम केल्यास (आपल्या व दुसऱ्याच्या) चित्तांतील कळतें ॥ ३४ ॥
आत्मा व बुद्धितत्व हीं परस्परांशीं फार भिन्न असून अभिन्न असें

मानणें हा **भोग** आहे. परार्थाहून निराळा जो स्वार्थ त्याचे ठिकाणीं संयम केल्यानें आत्म्याचें ज्ञान होतें ॥ ३५ ॥

त्यापासून प्रातिभश्रवण, स्पर्श, दर्शन, रसन आणि गंध हीं ज्ञानें ( योग्याला होतात ) ॥ ३६ ॥

हीं फळें समाधीला विघ्नकारक आहेत व समाधि नसतांना सिद्धी होतात ॥ ३७ ॥

शरीराच्या बंधाचें कारण नष्ट झालें असतां व प्रचाराचें ज्ञान झालें असतां चित्त दुसऱ्याचे शरीरांत जातें ॥ ३८ ॥

उदानाला जिंकला असतां पाणी, चिखल व कांटे ह्यांचा स्पर्श न होतां योगी वर राहातो ॥ ३९ ॥

समानाला जिंकला असतां योगी देदीप्यमान होतो ॥ ४० ॥

श्रोत्रेंद्रिय व आकाश ह्यांच्या संबंधाच्या ठिकाणीं संयम केल्यास श्रोत्रेंद्रिय उत्तम होतें ॥ ४१ ॥

शरीर व आकाश ह्यांच्या संबंधाच्या ठिकाणीं संयम केल्यास योगी कापसासारखा हलका होतो व आकाशांत फिरतो॥४२॥

शरीराच्या बाहेर शरीराकडे लक्ष न देतां जी वृत्ति ती **महाविदेहा.** त्या ठिकाणीं संयम केल्यास प्रकाशाचें आच्छादन नाहींसें होतें ॥ ४३ ॥

स्थूल, स्वरूप, सूक्ष्म, अन्वयत्व, व अर्थवत्व, ह्यांचे ठिकाणीं संयम केल्यास पंचभूतें वश होतात ॥ ४४ ॥

त्यापासून अणिमा इत्यादि सिद्धी उत्पन्न होतात, शरीरसंपत्ति मिळते व शरीराच्या धर्मांचा नाश होत नाहीं ॥ ४५ ॥

शरीरसंपत्ति ह्मणजे रूप, सौंदर्य, बळ, वज्राप्रमाणें कठिणपणा॥४६॥

ग्रहण, स्वरूप, अस्मिता, अन्वयत्व, व अर्थवत्व ह्यांच्या ठिकाणीं संयम केल्यास इंद्रियांवर जय मिळतो ॥ ४७ ॥

त्यापासून मनाच्या वेगाप्रमाणें वेग शरीराशिवाय इंद्रियांचा व्यापार व सर्व वश असणें (ह्या सिद्धी मिळतात) ॥ ४८ ॥

आत्मा आणि बुद्धि ह्यांचें भेदज्ञान झाल्यानें सर्व पदार्थांवर स्वामित्व व सर्वज्ञपणा येतो ॥ ४९ ॥

त्याच्यावरही वैराग्य झालें असतां दोषाचें कारण नाहींसें झाल्या-
मुळें मोक्ष होतो ॥ ५० ॥

देवांच्या बोलावण्याकडे लक्ष देऊं नये व आश्चर्य करूं नये, तसें
केल्यास पुनः वाईट प्रसंग येईल ॥ ५१ ॥

क्षण व त्याचा क्रम ह्यांच्या ठिकाणीं संयम केल्यास भेदज्ञान
होतें ॥ ५२ ॥

जाती, लक्षण, व देश ह्यांनीं ज्या ठिकाणीं भेद पडत नाहीं अशा
ठिकाणीं संयम केला असतां सारख्या पदार्थांमधील भेद
कळतो ॥ ५३ ॥

भेदज्ञानापासून जें तारकज्ञान उत्पन्न होतें त्याचा विषय सर्व
पदार्थ व त्यांचें स्वरूप हीं असून ते क्रम रहित आहेत॥५४॥

बुद्धि व आत्मा ह्यांची सारखी शुद्धि झाली असतां मोक्ष होतो॥५५॥

( पुढें चालूं. )

पुणे मराठी ग्रं...
६६८४

# विभूतिपादप्रतिपाद्योविषयः

अस्मिन्पादे अंतरंगयोगांगत्रयमभिधाय ( सू० १–३ ) तस्य च संयमसंज्ञां कृत्वा (सू० ४ ) संयमस्य विषयप्रदर्शनार्थं परिणामत्रयमुपपाद्य ( सू० ९–१० ) संयमबलोत्पद्यमानाः पूर्वांतापरांतमध्यभावाः ( सू० ११–१६ ) सिद्धीरुपदर्श्य ( सू० १७ ) समाध्याश्वासोत्पत्तये बाह्या भुवनज्ञानादिरूपा ( सू० १८–२८ ) अभ्यंतराश्च कायव्यूहज्ञानादिरूपाः प्रदर्श्य ( सू० २९–३८ ) समाध्युपयोगायेंद्रियप्राणादिजयपूर्विकाः प्रदर्श्य ( सू० ३८–४१ ) परमपुरुषार्थसिद्धये यथाक्रममवस्थासाहितभूतजयेंद्रियसत्वजयोद्भवाश्चव्याख्याय (सू० ४४–४९) विवेकज्ञानोत्पत्तये तांस्तान् उपायान् उपन्यस्य(सू० ५२–५३) तारकस्य सर्वसमाध्यवस्थापर्यंतभवस्य स्वरूपमभिधाय ( सू० ५४ ) तत्समापत्तेः कृताधिकारस्य चित्तसत्वस्य स्वकारणानुप्रवेशात् कैवल्यमुत्पद्यते ( सू० ५५ ) इत्यभिहितं इति व्याख्यातः विभूतिपादः॥

# विभूतिपादांतील विषय.

ह्या पादांत योगाचीं तीन अंतरंग अंगें सांगून ( सू० १–३ ), त्यांचें नांव संयम ठेवून ( सू० ४ ), संयमाचे विषय दाखविण्याकरितां तीन परिणाम सांगून ( सू० ९–१० ), संयमाच्या बळापासून उत्पन्न झालेले पूर्वांत, अपरांत व मध्यभाव हे तीन परिणाम दाखवून ( सू० ११–१६ ), व सिद्धी दाखवून ( सू० १७ ), समाधीवर भरंवसा बसण्यासाठीं भुवनें इत्यादिकांचे ज्ञानरूप बाहेरील सिद्धी सांगून ( सू० १८–२८ ), शरीरांतील रचनांचे ज्ञानरूप आंतील सिद्धी दाखवून ( सू० २९–३८ ), समाधीच्या उपयोगासाठीं अगोदर ज्यामध्यें इंद्रियें व प्राण ह्यांचा जय करावा लागतो अशा सिद्धी सांगून ( सू० ३८–४१ ), उत्कृष्ट पुरुषार्थ सिद्ध होण्याकरितां क्रमानें अवस्थासहित भूतजय, इंद्रियजय व सत्वजय ह्यांच्यांपासून झालेल्या सिद्धी सांगून ( सू० ४४–४९ ), बुद्धि व आत्मा हे निरनिराळे आहेत असें ज्ञान होण्यासाठीं जे जे उपाय असतील ते ते सांगून ( सू० ९२–९३ ), सर्व समाधींच्या शेवटीं होणारें तारकज्ञानाचें स्वरूप सांगून ( सू० ९४ ), त्यांच्या समापत्तीपासून जो योग्य अधिकारी झाला आहे त्याचें चित्त आपल्या कारणाच्या ठिकाणीं लय पावलें म्हणजे मोक्ष होतो ( सू० ९९), ह्याप्रमाणें विषय विभूति पादांत सांगितले आहेत.

# वेदांत ग्रंथ.

## परमेश्वराचें ज्ञान करून घेण्याची ज्यास इच्छा आहे अशा योग्य ब्राह्मणांकरितां खालीं लिहिलेले ग्रंथ

संस्कृत टीका व मराठी अर्थ व समजुतीच्या टिपा ह्यांसहित

**रा॰ रा॰ व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं तयार केलेले.**

| | किं॰ आ॰ | ट॰ ख॰ |
|---|---|---|
| ईशोपनिषत् | ॰८ | ॰१ |
| केनोपनिषत् | ॰८ | ॰१ |
| काठकोपनिषत् ( अध्याय १ ला व २ रा ) प्रत्येकास | ॰१२ | ॰१ |
| प्रश्नोपनिषत् | ॰१२ | ॰१ |
| मुंडकोपनिषत् | ॰१२ | ॰१ |
| मांडुक्योपनिषत् | १ | ॰२ |
| तैत्तिरीयोपनिषत् ( शिक्षावल्ली, ब्रह्मानंदवल्ली ) प्रत्येकास | ॰१२ | ॰१ |
| तैत्तिरीयोपनिषत् ( भृगुवल्ली ) | ॰८ | ॰१ |
| ऐतरेयोपनिषत् | ॰१२ | ॰१ |
| छांदोग्योपनिषत् ( प्रपाठक ४,५,६,७, व ८ ) प्र॰ | ॰१२ | ॰१ |
| बृहदारण्यकोपनिषत् ( अध्याय ४ था, ५वा व ६ वा ) प्र॰ | ॰१२ | ॰१ |
| नारायणोपनिषत् | ....छापीत आहे | |
| श्वेताश्वतरोपनिषत् | तयार होत आहे. | |
| मैत्र्युपनिषत् | तयार होत आहे. | |
| योगसूत्र ( समाधिपाद, साधनपाद, विभूतिपाद, ) प्रत्येकास | ॰१२ | ॰१ |
| ब्रह्मसूत्र | ..तरजुमा चालला आहे. | |
| गीता | ..तरजुमा चालला आहे. | |
| वेदांतसार | १॰८ | ॰२ |

सदर्हू बुकांच्या किंवा ह्याच ग्रंथकर्त्यांनीं केलेल्या इतर मराठी व इंग्लिश बुकांच्या दरएक प्रतीच्या टैटल पेजावर ग्रंथकर्त्याच्या नांवाचा शिक्का मारून विकण्याची पूर्वींपासून वहिवाट ठेविलेली आहे, आणि शिक्का नसलेली प्रत आढळल्यास तिजबद्दल कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

पुणें पेठ शुक्रवार,
घर नंबर ५९६.

**गंगाधर मोरेश्वर जोशी,**
निसबत व्यंकटराव रामचंद्र.